
पाक्षिक
प्रदेश बीजेपी

# मनोगत

मुंबई । वर्ष: 6 । अंक: 15 । 1 ऑगस्ट , 2024 । पृष्ठसंख्या: 36 । किंमत: 5 रू.

# महायुतीचेच सरकार येणार!













# अध्यक्षीय मनोगत

# एकच निर्धार, संपूर्ण विजय !

भारतीय जनता पार्टीचे महाअधिवेशन पुण्यात नुकतेच झाले. मा. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रमुख मार्गदर्शन झाले. या महाबैठकीला राज्यभरातून सुमारे सहा हजार पदाधिकारी उपस्थित होते. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपाला धक्का बसला. तरीही पुण्याच्या महाअधिवेशनाला मोठ्या संख्येने प्रतिनिधी उपस्थित होते. या सर्वांमध्ये जबरदस्त जोश होता. मा. अमितभाई आणि मा. देवेंद्रजींनी सर्वांच्या मनातला निर्धार व्यक्त केला. आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या नेतृत्वातील महायुती सरकार सत्तेवर येणार. २०१४ साली लोकसभा निवडणुकीत मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात भाजपा शिवसेना महायुतीने राज्यात ४८ पैकी ४२ जागा जिंकण्याचा पराक्रम केला. तेव्हापासून गेली दहा वर्षे राज्यात भाजपाची विजययात्रा चालू होती. लोकसभा, विधानसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपाच एक नंबरचा पक्ष राहिला. या लोकसभा निवडणुकीत अपेक्षित संख्येने आपले खासदार राज्यात निवडून आले नाहीत तरीही मतांच्या बाबतीत भाजपा राज्यात अजूनही पहिल्या क्रमांकावर आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीपेक्षा या निवडणुकीत भाजपाची मते वाढली आहेत. विरोधकांनी संविधान बदलणार आणि आरक्षण रद्द करणार असा फेक नॅरेटीव्ह निर्माण केला आणि त्यामुळे जे मतांचे धृवीकरण काही समाजघटकांमध्ये झाले त्याचा आपल्याला फटका बसला. पण आता विधानसभा निवडणुकीत आपण फेक नॅरेटीव्ह हाणून पाडू आणि आपला विकासाचा खरा नॅरेटीव्ह लोकांपर्यंत पोहोचवू. आपण सर्वजण प्रत्यक्ष फिल्डवर काम करणारे कार्यकर्ते आहोत. आपला बोलण्यापेक्षा काम करण्यावर विश्वास असतो. पण आता आपल्याला बोलण्यावरही भर द्यावा लागेल. मा. देवेंद्रजी म्हणाले त्याप्रमाणे आपल्याबद्दल फेक नॅरेटीव्ह निर्माण करणाऱ्यांना जागच्या जागी खणखणीत प्रत्युत्तर द्यायला हवे. मा. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशाचा अर्थसंकल्प सादर केला. त्यामध्ये विकसित भारतासाठी पायाभरणी करतानाच रोजगार निर्मिती आणि महिलांच्या कल्याणावर भर दिला आहे. या अर्थसंकल्पाबद्दल मी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि मा. निर्मला सितारामन यांचे अभिनंदन करतो. या अर्थसंकल्पाच्या बाबतीतही महाराष्ट्राला काही मिळाले नाही असा फेक नॅरेटीव्ह निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधकांनी केला. त्याला मा. देवेंद्रजींनी वेळीच खणखणीत उत्तर दिले. या अंकात त्याविषयी लेख आहे. आपणही वेळोवेळी विरोधकांना उत्तर दिले पाहिजे. आपल्या केंद्र सरकारचे आणि राज्य सरकारचे काम जबरदस्त आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात आपल्या राज्य सरकारने लाडकी बहीण आणि शेतकऱ्यांना मोफत वीज पुरवठा अशा अनेक चांगल्या योजना आणल्या आहेत. आपल्या सरकारचे काम जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहचविण्याचे कार्यकर्त्यांचे काम आहे. प्रत्यक्ष कामाच्या बाबतीत आपले विरोधक भाजपाशी स्पर्धा करू शकत नाहीत. विरोधकांचा भर भ्रम आणि भिती निर्माण करण्यावर असतो व त्यासाठी ते नॅरेटीव्हचा वापर करतात. आपण आगामी विधानसभा निवडणुकीत त्यांचा फेक नॅरेटीव्ह हाणून पाडू. खोट्याच्या माथी सोटा हाणू. विजय आपलाच आहे.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग



०४ महायुतीचेच सरकार येणार!


०७ विरोधकांना जशास तसे उत्तर द्या


१० नेतृत्वावर श्रद्धा ठेवून काम करा


१२ खोट्याच्या माथी सोटा!


१५ भारताच्या भविष्यावर मोठी गुंतवणूक करणारा अर्थसंकल्प


२१ रक्ताच्या नात्यापलीकडचे नाते!






संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया, bjpmaha.manogat@gmail.com editor.bjpmanogat@gmail.com येथे पाठवाव्यात.

**संपादकीय सल्लागार**

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

**विभागीय समन्वयक**

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २५ येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२-२२०२२०५०

# महायुतीचेच सरकार येणार!



एका बाजूला विरोधी पक्ष पराजित होऊनही विजयाच्या अहंकाराने फुगला आहे, तर दुसरीकडे विजयी होऊनही भाजपाचे कार्यकर्ते काहीसे निराश आहेत. लोकसभा निवडणुकीत अधिक जागांची अपेक्षा होती, पण ती कसर आगामी विधानसभा निवडणुकीत भरून काढण्यासाठी निस्वार्थपणे कामाला लागा, असे आवाहन भाजपा नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पुणे येथे महाराष्ट्र प्रदेश भाजपाच्या महाअधिवेशनाचा समारोप करताना केले. आगामी निवडणुकीनंतर महाराष्ट्रात भाजपाच्या नेतृत्वाखालील सरकार स्थापन होईल, असेही श्री. शाह यांनी जाहीर केले.

**लोकसभा** निवडणुकीत भाजपाला २४० जागा मिळाल्या, संपूर्ण इंडी आघाडीला एकत्रितपणेदेखील एवढ्या जागा मिळाल्या नाहीत. गेल्या तीन निवडणुकांतील सर्व जागा एकत्र केल्या तरी ही बेरीज एवढी होत नाही. देशाच्या जनतेने तिसऱ्यांदा बहुमताचे सरकार बनविण्याचा जनादेश दिला आहे. पण आमच्या कार्यकर्त्यांच्या अपेक्षा अधिक जागांची होती. अशा परिस्थितीत हताश होऊन चालत नाही, तर नव्या जोमाने कामाला लागावे लागते. ही वेळ याच वर्षात आली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत ही कसर भरून काढा, आणि राज्यात पुन्हा सत्ता आणा, हताश होऊ नका, महाराष्ट्राच्या निवडणुकांचे निकाल सुनिश्चित असून आतापर्यंतचा सर्वात मोठा विजय महाराष्ट्रात मिळेल व प्रचंड बहुमताने भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली आगामी निवडणुकीनंतर राज्यात सरकार बनेल, हे माझे शब्द लिहून




## शरद पवार यांना जाहीर चर्चेचे आव्हान

**शरद पवार यांच्याकडे हिंमत असेल तर केंद्रातील यूपीए सरकारमध्ये मंत्री असताना महाराष्ट्राकरिता काय केले, याचा हिशेब देण्यासाठी त्यांनी पुण्याच्या कोणत्याही चौकात चर्चेसाठी यावे, आमचे मुरलीधर मोहोळ त्याचा संपूर्ण हिशेब जनतेसमोर मांडतील, असे आव्हानही त्यांनी दिले. महाराष्ट्राकरिता मोदी सरकारने केलेल्या विकास कामांची संपूर्ण यादीच शाह यांनी कार्यकर्त्यांसमोर मांडली. पवार यांनी कृषीमंत्री असूनही दहा वर्षांत साखर कारखान्यांच्या इन्कम टॅक्सचा प्रश्नदेखील सोडविला नाही, तो मोदी यांनी चुटकीसरशी सोडविला, असे ते म्हणाले.**

ठेवा, अशी विश्वासपूर्ण ग्वाहीदेखील श्री. शाह यांनी दिली.

विचारधारा हे आमच्या पक्षाचे वैशिष्ट्य आहे, असे सांगून श्री. शाह म्हणाले की, या विचारधारेशी बांधील राहूनच गेल्या दहा वर्षांत नरेंद्र मोदी यांनी देशाच्या विकासासाठी काम केले. कलम ३७० समाप्त करून काश्मीरला कायमचे भारतात समाविष्ट केले. वर्षानुवर्षांचा संघर्ष संपुष्टात आणून अयोध्येत रामलल्लाचे मंदिर बनविले. काशी विश्वनाथ कॉरिडॉर नव्या अभिमानाने मोदी सरकारच्या काळात निर्माण झाला. समान नागरी कायदा आणण्याचे कामही मोदी सरकारकडूनच होणार असून देश त्याची प्रतीक्षा करत आहे. मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने देशातील दहशतवाद, नक्षलवाद, समाप्त करून देशाला सुरक्षित केले. काही माध्यमसमूह खोट्या बातम्या देऊन दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत, पण तीस वर्षांसाठी देशात भाजपाचे सरकार देशात सत्तेवर असेल, हा आमचा विश्वास आहे. आपापसातील मतभेद समाप्त करून, स्वाभिमान जागृत ठेवून व विचारधारेवर विश्वास ठेवून आपल्याला पुढे जायचे आहे. दीनदयाळजींनी दिलेल्या अंत्योदयाच्या स्वप्नाची पूर्तता करण्याचे, गरीब कल्याणाचे काम मोदी सरकार करत आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली.

काँग्रेसकडून अपप्रचार सुरू आहे. गरीब, पददलित, आदिवासींचा विकास करण्याचा खोटारडा दावा काँग्रेसवाले करत आहेत, पण पन्नास वर्षे सत्ता असताना काँग्रेसने गरीब कल्याणासाठी काय केले, असा सवालही अमित शाह यांनी केला. काँग्रेस व इंडी आघाडीचे नेते समाजात



## राहुल गांधींचा खटाखट खोटारडेपणा!


**देशाने राहुल गांधींच्या खटाखट आश्वासनावर विश्वास ठेवला नाहीच, पण ज्या राज्यांत त्यांची सरकारे आहेत, तेथे तरी त्यांनी खटाखट पैसे द्यावेत, असे आव्हानही त्यांनी दिले. तेलंगणा, कर्नाटक हिमाचलातील एक तृतीयांश आश्वासनेही त्यांनी पूर्ण केलेली नाहीत. मोदी सरकारने आपले प्रत्येक आश्वासन पूर्ण केले. महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस सरकारने राज्यात विकासाचे महामार्ग उभे केले. अनेक महत्वाकांक्षी योजना पूर्ण केल्या. २०१४ ते २०१९ हा फडणवीस यांचा सत्तेचा कार्यकाळ महाराष्ट्राच्या इतिहासात अभिमानाने नोंदला जाईल, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले.**

## औरंगजेब फॅन्स क्लबचे उबाठा अध्यक्ष

**बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेणाऱ्या काँग्रेसने त्यांचा जेवढा अपमान केला, तेवढा ब्रिटिशांनीही केला नव्हता. भाजपा सरकारने बाबासाहेबांचा सन्मान केला. मोदी सरकारने देशाची सुरक्षा सुनिश्चित केली, नक्षलवादाची पाळेमुळे खणून दोन वर्षांत हा देश नक्षलमुक्त होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. औरंगजेब फॅन क्लबकडून देश सुरक्षित राहणार नाही. कसाबला बिर्याणी खाऊ घालणाऱ्यांच्या मांडीवर बसून स्वतःस बाळासाहेबांचा वारस म्हणविणारे उद्धव ठाकरे हे औरंगजेब फॅन क्लबचे नेते आहेत, अशा शब्दांत त्यांनी ठाकरे यांचीही खिल्ली उडविली.**

संभ्रम पसरवत आहेत, त्यामध्ये गुरफटू नका. आरक्षण संपविण्याच्या खोट्या प्रचारामुळे संभ्रम पसरला, आणि उत्तर देण्यात आपण कमी पडलो, याची कबुली देऊन ते म्हणाले, गेल्या दहा वर्षांत मोदी सरकारने आरक्षणाला बळ दिले. काँग्रेसने संविधान बदलण्याचा अपप्रचारही केला, पण मोदी सरकारने संविधानास सर्वश्रेष्ठ मानले आहे. जेव्हा जेव्हा महाराष्ट्रात भाजपाचे सरकार येते, तेव्हा तेव्हा मराठा आरक्षण मिळते, आणि जेव्हा शरद पवारांच्या आशीर्वादाने सरकार येते, तेव्हा आरक्षण समाप्त होते, असा थेट आरोपही शाह यांनी केला. शरद पवारांचे सरकार आले, तर मराठा आरक्षण गायब होईल, असा इशारा देत ते म्हणाले की, संभ्रम सोडा, समाजाच्या प्रत्येक घटकास भाजपानेच न्याय दिला आहे हे लक्षात ठेवा. शरद पवार हा भ्रष्टाचाराचा सर्वात मोठा शिरोमणी आहे. या देशात भ्रष्टाचाराला संस्थात्मक प्रतिष्ठा देण्याचे काम शरद पवार यांनी केले, पण आता शरद पवारांचा खोटेपणा चालणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. घरोघरी जाऊन पवारांच्या खोटारडेपणाचा पर्दाफाश केला जाईल, संभ्रम पसरविण्याचे सारे प्रयत्न हाणून पाडले जातील. आता स्वार्थ सोडून प्रत्येक कार्यकर्ता पक्षाच्या विजयासाठी परिश्रमाची पराकाष्ठा करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्रातील युतीच्या प्रत्येक उमेदवारास विजयी करण्यासाठी कार्यकर्त्यांने संपूर्ण बळ पणाला लावावे, आणि २०१४ पेक्षाही अधिक भव्य विजय मिळेल, यासाठी जबाबदारीने कामाला लागावे, असा आदेश त्यांनी दिला. ■

# विरोधकांना जशास तसे उत्तर द्या



● देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

> पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या प्रदेश अधिवेशनात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले मार्गदर्शन. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाषणाची सुरुवातच गुरुपौर्णिमेचा उल्लेख करत केली.

**आज** गुरू पौर्णिमा आहे आणि आपला गुरु आहे भगवा ध्वज. या भगव्या ध्वजाला मी अभिवादन करतो, वंदन करतो. हा भगवा ध्वज शिवाजी महाराजांचा आहे आणि हिंदुत्वाचा आहे. हा भगवा ध्वज प्रभू श्रीरामांचा आहे, भारतमातेचा, अखंड भारताचा हा भगवा ध्वज आहे. या राज्यात महायुतीचे सरकार निवडून येईल आजची तारीख लिहून ठेवा. या पावन भूमीत २०१३ ला इथेच आपल अधिवेशन झालं होतं, आणि २०१४ ला आपल सरकार आलं. २०२४ च्या निवडणुकीत जनता आपल्या पाठीशी असेल, २०२४ ची निवडणूक आपण चार लोकांच्या विरोधात लढत होतो फेक नरेटीव्ह सोबत आपण लढत होतो. केवळ, ०.३ टक्क्यांनी मते कमी झाल्यामुळे आपल्या जागा कमी झालेल्या आहेत. आपल्याला आता थोडी मेहनत करण्याची गरज आहे, आता फेक नरेटीव्हला उत्तर देणार आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आरक्षणाची सीमा वाढवली, पण एक खोटा नरेटीव्ह तयार केला की हे निवडून आले तर आरक्षण रद्द करणार. खोटं फार काळ टिकत नाही, खोट्याचा फुगा आम्ही फोडायला सुरुवात केली आहे. विधान परिषदेत आम्ही टाचणी लावलीय. महायुतीचे आमदार फुटणार अशी हवा महाविकास आघाडीच्या नेत्यांनी तयार केली होती. अरे, तुमचे २० आमदार केव्हा फुटले हे तुम्हाला कळले नाही. आज भाजपाचा विचार गावागावात पोहोवण्यासाठी आपण एकत्र आलो आहोत. विरोधक लबाड आहेत. आपण लाडकी बाहीण योजना आणली. जवळपास साडेतीन कोटी महिलांना थेट त्यांच्या खात्यात महिन्याला १५०० रुपये मिळणार आहेत. आपल्या सरकारने हे काम केले आहे.

विरोधक नाटकी आहेत. ते सभागृहात सांगतात, ही योजना खोटी आहे. ही योजना चालू शकणार नाही. पण गावात सर्वात पहिलं पोस्टर यांचंच आहे. ते या योजनेच्या विरोधात न्यायालयातही जात आहेत. मी भाजपाचे नेते आणि कार्यकर्त्यांना विनंती करतो की, त्यांनी जमिनीवर उतरलं पाहिजे. आपली संघटना, यंत्रणा जमिनीवर उतरली पाहिजे. माताभगिनींना मदत करून लाडकी बहीण योजनेसाठी फॉर्म भरून घेतले पाहिजेत.

महाविकास आघाडीच्या लोकांनी एक योजना आखली आहे. हे लोक महिलांचे फॉर्म भरून घेणार आहेत आणि लाडकी बहीण योजेसाठी त्यांचे फॉर्मच देणार नाहीत. महिलांच्या मनात सरकारविरोधात रोष निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. ही योजना यशस्वी कशी होईल हे आपण पाहिलं पाहिजे. मी चंद्रकांत पाटील यांच अभिनंदन करतो. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वातील सरकारने मुलींना फीमध्ये १०० टक्के सवलत देण्याचं काम केलं आहे. आता माझ्या लहान मुलींना, बहिणींना कॉलेजमधून शिक्षण घेण्यासाठी स्वत:च्या घरातून एक रुपयाही द्यावा लागणार




नाही. महिलांना वर्षाला तीन सिलेंडर मोफत देण्याची योजना आम्ही आणली. सिलेंडरच्या किमती महागल्या असे ते म्हणतात. पण २०१३ सालच्या सिलेंडरच्या किमती दाखवल्या की ते गप्प बसतात. पण आपण असे लोक आहोत की आपण उत्तर देत नाही. आपल्या प्रत्येकाला उत्तर देता येतं. पण प्रत्येकजण आदेशाची वाट पाहतो.

मी तुम्हाला आज एक गोष्ट सांगतो. आज मी तुम्हाला परवानगी देतो. ज्याला बॅटिंग करायची आहे, त्याने करा. मैदानात उतरा पण अट एकच आहे. की हिट विकेट व्हायचं नाही. सेल्फ गोल करायचा नाही. काही लोक बोलायला उतरले की समोरच्यावर बोलायच्या ऐवजी आपल्यावरच बोलतात. काही लोक असे आहेत की ते बोलल्यावर त्याचीच उत्तरं चार दिवस द्यावी लागतात. आदेश विचारू नका, मैदानात उतरा आणि ठोकून काढा. शेतकऱ्यांना वीज मोफत म्हणजे मोफतच! मुलींना मोफत शिक्षण, १० लाख युवकांना प्रशिक्षणाकरिता दरमहा दहा हजार रुपये स्टायपेंड, अशा अनेक योजना महायुती सरकार राबवत आहे, त्याचा जोरदार प्रचार करा.

प्रत्येकाच्या तोंडी योजना असलीच पाहिजे. प्रत्येकाला सरकारच्या योजना सांगितल्याच पाहिजेत. कोणाच्या लग्नाला गेलात तरीही या योजना सांगा. कारण पब्लिक मेमरी फार शॉर्ट असते. चांगल्या गोष्टी इको होत नाहीत. त्यामुळे या योजना पुन्हा-पुन्हा सांगणे गरजेचे आहे. जे चांगले असते, ते सर्वत्र पोहोचत नाही. नकारात्मक बाबी लवकर फैलावतात. फेक नॅरेटिव्ह हे एक मोठे षड्यंत्र आहे. भारत कमकुवत राहावा, मोदी पंतप्रधान राहिल्यास भारत शक्तिशाली होईल आणि आपला टिकाव लागणार नाही असे वाटणाऱ्यांचा हा कट आहे. मी निश्चितपणे सांगतो की, आपण मोठी तयारी केली आहे. आता चिंता करायची नाही. आता फेक नरेटिव्हला चोख नरेटिव्हने उत्तर देण्याची तयारी आपण करत आहोत. पण मला तुमच्याकडून अपेक्षा आहेत. भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते, पदाधिकारी खूप आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले होते की, सगळे भारतीय थुंकले तरी इंग्रज वाहून जातील. अशाच प्रमाणे आपल्यातील प्रत्येकाने सोशल मीडियावर रोज एक पोस्ट केली तरी फेक नरेटिव्ह संपून जाईल. दुर्दैवाने आमचे लोकप्रतिनिधीही या पोस्ट करत नाहीत. लोकप्रतिनिधींची सोशल मिडिया हँडल बघा. अरे, आपण जमिनीवरची लढाई लढतोय. पण सोबतच ही लढाई टेक्नॉलॉजीची झाली आहे. तुमच्याबाबतीतला खोटा नरेटिव्ह तंत्रज्ञानाच्या मदतीने लोकांपर्यंत पोहोचवण्यात आला आहे. त्याला उत्तर दिलं नाही तर आपण त्यांचा मुकाबला करू शकणार नाही. तुम्ही सर्वांनी गांभीर्याने घेतलं तर हे चित्र बदलेल. राज्यात विचित्र स्थिती आहे. समाजा-समाजात दुफळी तयार झाली आहे. दुर्दैवाने राज्यातील काही नेत्यांना असं वाटतं की हा समाज एकमेकांविरोधात उभा राहिला आपण निवडून येऊ शकतो. त्यामुळे काही नेते पेट्रोल टाकण्याचं काम करत आहेत. मराठा समाजातील गरीब मराठ्यांना आरक्षण मिळालं पाहिजे, ही भाजपाची पहिल्या दिवसापासूनची भूमिका आहे. आरक्षणाची लढाई १९८२ साली चालू झाली. स्वर्गीय अण्णासाहेब पाटलांनी स्वतःला गोळी घालून घेतली. १९८२ सालापासून अनेक सरकारे आली. शरद पवार चारवेळा मुख्यमंत्री होते. तेव्हा मराठा आरक्षण का दिलं नाही? तुम्ही चारवेळा रेकॉर्डवर सांगितलं की मराठा समाजाला आरक्षणाची गरज नाही. आता मतांसाठी दुफळी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. जोपर्यंत

आम्ही होतो तोपर्यंत आम्ही आरक्षण टिकवलं. दुर्दैवाने महविकास आघाडीचं सरकार आलं अन् आरक्षण गेलं. आता आम्ही पुन्हा मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिलं. आज भरती चाललेली आहे. पोलीस भरतीमध्ये हजारो तरुण आता मराठा समाजाचे भरती झाले आहेत. हजारो तरुणांची वेगवेगळ्या खात्यांमध्ये भरती झालेली आहे. हे सगळं होत असताना देखील मराठा आरक्षणाचे राजकारण चाललंय. अण्णासाहेब पाटलांचे चिरंजीव नरेंद्र पाटील यांचे मी अभिनंदन करेन. आम्ही अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची घोषणा केली. त्याला निधी दिला. या महामंडळाने एक लाख मराठा तरुणांना उद्योजक बनवून दाखवलं. आज सारथीच्या माध्यमातून ज्यावेळी तरुण पुढे येतात आणि म्हणतात सारथी होतं म्हणून आम्ही आयएएस झालो. मला आनंद होतो, आम्हाला सगळ्यांना आनंद होतो. कारण आपल्या सरकारने सारथी सुरू केलं. पवार साहेबांच्या आणि उद्धव ठाकरेंच्या सरकारने सुरू केलेले नाहीये. जे काही आंदोलन चाललंय त्याबद्दल मनोज जरांगे पाटलांना माझा सवालच नाहीये. माझा सवाल उद्धव ठाकरे, शरद पवार साहेब आणि नाना पटोले यांना आहे की, तुम्ही या आंदोलनामध्ये तुमची भूमिका स्पष्ट करा, तुम्ही सांगा की मराठा समाजाला ओबीसीमध्ये आरक्षण देण्याकरता शरद पवार साहेब, उद्धव ठाकरे साहेब आणि नाना पटोले साहेब तुमचं समर्थन आहे का? एकदा हे स्पष्ट करा. ही दुटप्पी भूमिका सोडा.

आमच्या हिंदुत्वाने कधीही कोणास वेगळे मानले नाही. या देशाची मानके जो आपली मानतो, तो कोणत्याही जातीधर्माचा असलेला प्रत्येकजण हिंदू आहे, असे आम्ही मानतो. पण याच महाराष्ट्रात शिवप्रेमींना दहशतवादी ठरविले जाते, संसदेत राहुल गांधी हिंदूंना हिंसाचारी म्हणतात, हे खपवून घ्यायचं का? खोटे बोलून तुम्ही काही काळ जनतेला फसवू शकता, पण सत्य पचवावेच लागते. आज जागे झाला नाहीत, तर उद्या जागे होण्याची संधीदेखील मिळणार नाही. हिंदुत्वाबद्दल कोणालाही अपराधी वाटण्याचे कारण नाही. हिंदुत्व हा आमचा गर्व आहे, हिंदुत्व ही सहिष्णुता आहे. हिंदुत्वामुळेच या देशात वेगवेगळ्या धर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहात आहेत. आमचे अस्तित्व संपविण्याचा प्रयत्न कोणी करणार असेल तर ते सहन केले जाणार नाही.

फेक नॅरेटिव्ह हा आजचा रावण आहे, त्याच्या बेंबीत बाण मारला, की पुन्हा आपलीच सत्ता येईल. एक कविता सांगावीशी वाटते ''असे जगावे दुनियेमध्ये आव्हानाचे लावुनि अत्तर नजर रोखून नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर या कवितेप्रमाणे आत्मविश्वासाने उत्तर देणारा कार्यकर्ता आपल्याला तयार करायचा आहे.

पक्षात वर्षानुवर्षे काम करणारे ९० टक्के कार्यकर्ते निरपेक्षपणे केवळ विचारांकरिता, काम करतात. केवळ सत्ता हा आपला उद्देश नव्हता. महाराष्ट्रात जेव्हा आमच्या कार्यकर्त्यांवर अत्याचार होत होते, तेव्हा आपण हे परिवर्तन घडविताना बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांवर चालणारे खरे अनुयायी असलेले एकनाथराव शिंदे, नंतर अजितदादांना सोबत घेतले. ज्यांच्याशी संघर्ष केला, त्यांच्याशी सलगी कशी करायची असे अनेकांना वाटले, पण ध्येय साध्य करताना कधी तडजोडी कराव्या लागतात, दोन पावले मागे घ्यावी लागतात. मोदीजींनी निर्माण केलेला, प्रगतीकडे जाणारा हा भारत आता कुणीही थांबवू शकणार नाही. काही लोकं नुसते सल्ले देतात, काम करत नाहीत. आमच्याकडून काही चुका घडल्या असतील, पण त्या चुका पोटात घातल्या पाहिजेत.

केवळ कोरड्या चर्चा करून निष्ठेने पक्षासोबत असलेल्या कार्यकर्त्यांच्या मनात विष कालवू नका. विपरीत परिस्थितीत, फेक नॅरेटिव्हमध्ये केवळ दोन लाख मतांनी आपण मागे पडलो, आता ती चूक पुन्हा होणार नाही. यावेळी पावणेदोन कोटी मते घेतल्याखेरीज राहणार नाही. मुख्यमंत्री महायुतीचाच राहील. कोण मुख्यमंत्री, हा प्रश्न आज आपल्यासमोर नाही. तो काढून टाका. पुन्हा सेवेसाठी सरकार व त्याकरिता वाटेल ती किंमत मोजायची तयारी ठेवा. मी या ठिकाणी येवढेच सांगू इच्छितो,

***लहरों को साहिल की दरकार नहीं होती***
***हौसले बुलंद हो तो सामने कोई दीवार नहीं होती।***
***जलते हुए दिए ने आंधियों से ये कहा कि***
***रौशनी देने वालों की कभी हार नहीं होती।।***

आपण जिंकणार ही मानसिकता घेऊन जा. आज या ठिकाणी तुमचा प्रतिनिधी म्हणून सांगतो भारतीय जनता पार्टी हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष असेल आणि महायुतीच सरकार या महाराष्ट्रामध्ये आपण स्थापन करून दाखवू. ■

# नेतृत्वावर श्रद्धा ठेवून काम करा

● चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेशाध्यक्ष

> पुणे येथे झालेल्या अधिवेशनात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेले मार्गदर्शन...




**राज्यभरातून** या अधिवेशनासाठी जमलेल्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे मी स्वागत करतो. लोकसभा निवडणूक निकालात काही अपेक्षित गोष्टी घडल्या नाहीत. त्यामुळे पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये काहीशी अस्वस्थता आहे. मात्र या निकालाबाबत आपण वस्तूस्थिती जाणून घेतली तर विरोधक म्हणतात त्याप्रमाणे त्यांचा विजय झालेला नाही, हे लक्षात येईल. सर्वात मुख्य गोष्ट म्हणजे महायुतीच्या जागा कमी झाल्या, मात्र आपला जनाधार कमी झालेला नाही. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्या मतात फक्त दोन लाखांचा फरक आहे. या दोन लाखांच्या फरकामुळे महायुती आणि महाविकास आघाडीतील जागांचा फरक १४ वर गेला आहे. संविधान बदलून अनुसूचित जाती अनुसूचित जमातीचे आरक्षण बंद करणार, यासारखा खोटा प्रचार केल्यामुळे आपली पीछेहाट झाली. सध्या राज्यात मराठा आरक्षणाच्या विषयावर चर्चा सुरू आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री असताना मोठ्या परिश्रमाने मराठा आरक्षणाचा मसुदा तयार केला. उच्च न्यायालयात हे आरक्षण टिकले, सर्वोच्च न्यायालयाने पहिल्या सुनावणीत फडणवीस सरकारने दिलेल्या आरक्षणाला स्थगिती देण्यास नकार दिला. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाविषयीची सुनावणी झाली. उद्धव ठाकरेंच्या सरकारला मराठा समाजाला आरक्षण देणे का आवश्यक आहे, हे कायद्याचा आधार घेऊन सर्वोच्च न्यायालयापुढे योग्य पद्धतीने सांगता आले नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने मराठा समाजाचे आरक्षण रद्द केले. सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षण टिकले नाही, याची संपूर्ण जबाबदारी उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांचीच आहे. त्या अर्थाने उद्धव ठाकरे आणि शरद पवार हेच मराठा आरक्षणाचे मारेकरी आहेत. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना अन्य मागासवर्गीयांचे (ओबीसी) राजकीय आरक्षण न्यायालयाने रद्द केले. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राज्यात सत्तेत आल्या–आल्या ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण परत मिळवून दिले. ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण परत मिळवून दिल्याबद्दल मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांचे अभिनंदन करतो.

लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी आपल्या विरुद्ध खोटा प्रचार केला. मात्र त्याबरोबरच या निवडणुकीत




संघटनात्मक बाबीत आपण कुठे कमी पडलो, याचाही विचार आपण करायला हवा. पंकजा मुंडे, सुभाष भामरे, उज्ज्वल निकम, नवनीत राणा, डॉ. सुजय विखे, मिहीर कोटेचा हे उमेदवार ३० हजारांपेक्षा कमी मताधिक्याने पराभूत झाले. आपण प्रत्येक बूथवर २० मते जादा मिळवली असती तरी हे सर्व उमेदवार आज लोकसभेत दिसले असते. मतदार नोंदणी, आपल्या हक्काचे मतदान करून घेणे, लाभार्थ्यांचे मतदान अशा तिन्ही गोष्टींकडे लक्ष केंद्रीत केले असते तर आपण आणखी १० जागा सहज जिंकल्या असत्या. आगामी ४ महिने आपल्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहेत. आपण प्रत्येकाने प्रत्येक बूथवर किमान १० नवे मतदार नोंदवण्याचा निर्धार केला तर आपण विधानसभेत मोठा विजय मिळवू. पक्षाकडून मला काय मिळाले याचा विचार करण्याची ही वेळ नाही. नेतृत्वावर श्रद्धा ठेवून काम केले तर विजय आपलाच आहे. महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आले तर केंद्रातील मोदी सरकारच्या आणि राज्यातील महायुती सरकारच्या सर्व चांगल्या योजना बंद करतील. राज्यात पुन्हा डबल इंजिनचे सरकार आले तर महाराष्ट्राचा दुप्पट गतीने विकास होईल. लोकसभा निवडणूक निकालाने निराश होण्याचे अजिबात कारण नाही. जिद्दीने संघर्ष करणे हा भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांचा पिंड आहे. येथून परत जाताना आपण परत सत्ता मिळवायचीच, महायुतीचे सरकार पुन्हा आणायचेच, असा निर्धार करून जायचे आहे. २०१४ मध्ये केंद्रात आणि राज्यात सत्ता येण्यापूर्वी आपले याच ठिकाणी अधिवेशन झाले होते. आता विधानसभा निवडणुकीपूर्वी आपण त्याच ठिकाणी एकत्र आलो आहोत. विजय आपलाच आहे, याचा विश्वास बाळगून कामाला सुरूवात करा.

**लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला महायुतीपेक्षा अधिक जागा मिळाल्या असल्या तरी आघाडीला महायुतीपेक्षा फक्त दोन लाख मते अधिक मिळाली आहेत. महाविकास आघाडीला २ कोटी ५० लाख तर महायुतीला २ कोटी ४८ लाख मते मिळाली आहेत. मुंबईत महायुतीला महाविकास आघाडीपेक्षा दोन लाख मते अधिक मिळूनही महायुतीला फक्त दोन जागा मिळाल्या. त्यामुळे आपल्याला हे अंतर भरून काढायचे आहे. हे अंतर नवीन मतदार नोंदणी आणि आपले हक्काचे मतदान करून घेऊन भरून काढता येईल.**

**जय हिंद, जय महाराष्ट्र**

# खोट्याच्या माथी सोटा!




भाजपच्या बालेवाडी येथील महाअधिवेशनाने ऐतिहासिक यश मिळविण्याचा संकल्प सोडला. अधिवेशनास उपस्थित प्रत्येक कार्यकर्त्याने समोर आलेले आव्हान पेलण्याचा निश्चय केला. विरोधकांच्या खोट्याच्या माथी सोटा हाणण्याचा निर्धार करणाऱ्या या अधिवेशनाविषयी..

'**भगवा** ध्वज हा गुरू, पक्षनेतृत्व हे मार्गदर्शक आणि कार्यकर्ता ही ऊर्जा' असा त्रिवेणी संगम २१ जुलै रोजी पुण्याच्या बालेवाडी क्रीडा संकुलातील भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश अधिवेशनात घडून आला आणि कोणत्याही आव्हानाला छाताडावर पेलून ते समर्थपणे परतवून लावण्याचा नवा निर्धार करून पक्षाचे राज्यभरातील बिनीचे कार्यकर्ते कार्यक्षेत्रात परतले. आता लढाई दुहेरी आहे.

केंद्र आणि राज्य सरकारच्या जनहिताच्या कामांची आणि योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवून लोकसभा निवडणुकीतील जेमतेम एक शतांशाहूनही कमी पडलेल्या मतांची भरपाई करण्यासाठी नवी शस्त्रे परजण्याची मुभा पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्यास प्राप्त झाली आहेच, पण याच जनहिताच्या अनेक योजनांविषयी जनतेच्या मनात खोटे कालवून संभ्रम निर्माण करण्याच्या विरोधकांच्या कुटिल नीतीची खेळी हाणून पाडण्याचे आव्हानही या लढाईत पेलावे लागेल. उपस्थित असलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याने त्या आव्हानाचे अत्तर लावून राजकारणाच्या आणि विरोधकांच्या खोट्याच्या माथी सोटा हाणण्याच्या निर्धाराने जगण्याचे ठरविले आहे.

'या तो हम जीतते है, या सीखते है!' ... हे अटलबिहारी वाजपेयी यांनी पूर्वी उच्चारलेले वाक्य पुन्हा कार्यकर्त्यांना प्रेरित करीत आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणुकांनी पक्षाला आणि कार्यकर्त्यास बरेच काही शिकविले आहे, आणि नव्या महाविजयाचा नवा विश्वासही रुजविला आहे. भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्यामध्ये त्वेषाने लढण्याचे स्फुल्लिंग चेतविणारे हे अधिवेशन अविस्मरणीयच नव्हे, तर ऐतिहासिक ठरले आहे. तेथील प्रेरणेमुळे आगामी विधानसभा निवडणुकीतील महाविजयाच्या संकल्पाची बीजे रुजली आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे कार्यकर्त्यांना संबोधित करत होते, त्यावेळी त्यांच्या प्रत्येक शब्दागणिक चैतन्याचे स्फुल्लिंग चेतविले जात होते. अपयशाच्या खिन्न भावना पुसल्या गेल्या होत्या, संभ्रम दूर झाला होता. लोकसभेच्या निवडणुकीत देशाने काँग्रेसला नाकारले, सातत्याने पराजय पहावा लागलेल्या या पक्षाचे संख्याबळ किंचित वाढताच या पक्षाच्या नेत्यांचा अहंकार उफाळून आला. खरे तर लोकसभा निवडणुकीच्या परीक्षेत काँग्रेस सपशेल नापास झाली आहे, त्यामुळे नापासांच्या अहंकाराचा बाऊ करून संभ्रमित न होता, भाजपाप्रणित आघाडीला मिळालेला देशाचा सकारात्मक कौल पाहून प्रोत्साहित होण्याचा संदेश अमितभाईंच्या मार्गदर्शनातून कार्यकर्त्यांना मिळाला. उद्धव ठाकरे सरकारने मोदी सरकारच्या १८ योजना बंद पाडल्या. ओबीसी समाजाचे परत गेलेले आरक्षण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आणले. महाविकास आघाडीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुक थांबवण्याचे पाप केले, हे सगळे जनतेला ठाऊक आहे, पण खोटे सांगण्याचा विरोधकांचा मारा इतका आहे की, जनतेला परत सांगावे लागणार आहे. हे माझे सूत्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोदाहरण समजावून दिले. ते म्हणाले, '१९८२ ते २०१४ पर्यंत जास्तीत जास्त सरकारे काँग्रेसची होती.

शरद पवार स्वतः मुख्यमंत्री होते. १९८२ पासून मराठ्यांना का आरक्षण दिले नाही, असा सवालही त्यांनी शरद पवार व काँग्रेसला केला. आता मतांकरीता दुफळी निर्माण करण्याचे काम सुरू आहे. आमचे सरकार होते, तेव्हा आम्ही आरक्षण दिले, सुप्रीम कोर्टातही आरक्षण टिकवून दाखवले. उद्धव ठाकरे आणि शरद पवारांचे सरकार आले, आणि आरक्षण कोर्टात टिकले नाही. टिकवण्याचे प्रयत्न झाले नाहीत. आज मात्र त्यावरून राजकारण सुरू आहे.'

### मोठे षड्यंत्र

'फेक नॅरेटिव्ह' हे एक मोठे षड्यंत्र आहे. लोकांपर्यंत खोटे पोहोचविणे हा या मूठभरांचा कट नाही. भारत कमकुवत राहावा, मोदी पंतप्रधान राहिल्यास भारत शक्तिशाली होईल आणि आपला टिकाव लागणार नाही, असे वाटणाऱ्यांचा हा कट आहे. आपण ताकदीने मैदानात उतरून फेक नॅरेटिव्हला चोख नॅरेटिव्हने उत्तर देण्याची तयारी आपण केली आहे. आपल्यापैकी प्रत्येकाने रोज एक नोंद केली तरी फेक नॅरेटिव्ह संपून जाईल. पण दुर्दैवाने, कार्यकर्ते किंवा लोकप्रतिनिधीदेखील उदासीन आहेत. ही लढाई आज सोशल मीडियाच्या मैदानावर आहे. 'फेक नॅरेटिव्ह' हा आजचा रावण आहे, त्याच्या बेंबीत बाण मारला, की पुन्हा आपलीच सत्ता येईल. विरोधकांचा खोटारडेपणा सिद्ध करताना गृहमंत्री अमित शाह यांनी थेट भूमिका घेतली. ते म्हणाले, काँग्रेसकडून अपप्रचार सुरू आहे. गरीब, पददलित, आदिवासींचा कल्याण करण्याच्या खोटारडा दावा काँग्रेसवाले करत आहेत, पण पन्नास वर्षे सत्ता असताना काँग्रेसने गरीब कल्याणासाठी काय केले? आरक्षण संपविण्याच्या खोट्या प्रचारामुळे संभ्रम पसरला आणि उत्तर देण्यात आपण कमी पडलो, याची कबुली देऊन ते म्हणाले, 'गेल्या दहा वर्षांत मोदी सरकारने आरक्षणाला बळ दिले. काँग्रेसने घटना बदलण्याचा अपप्रचारही केला. पण मोदी सरकारने घटनेस सर्वश्रेष्ठ मानले आहे. जेव्हा-जेव्हा महाराष्ट्रात भाजपाचे सरकार येते, तेव्हा-तेव्हा मराठा आरक्षण मिळते आणि जेव्हा शरद पवारांच्या आशीर्वादाने सरकार येते, तेव्हा आरक्षणाचा मुद्दा समाप्त कसा काय होतो? आता बघा, शरद पवारांचे सरकार आले, तर मराठा आरक्षण गायब होईल! घरोघरी जाऊन पवारांच्या खोटारडेपणाचा पर्दाफाश केला जाईल, संभ्रम पसरविण्याचे सारे प्रयत्न हाणून पाडले जातील. काँग्रेस नेते राहुल गांधींचा खटाखट खोटारडेपणा म्हणा की, कसाबला बिर्याणी खाऊ घालणाऱ्यांच्या मांडीवर बसून स्वतःस बाळासाहेबांचा वारस म्हणविणारे उद्धव ठाकरे हे 'औरंगजेब फॅन क्लब'चे नेता आहेत, असा घणाघात शहा यांनी केला. जे खोटे असते, त्याचे वय कमी असते. त्यामुळेच विधान परिषदेच्या निवडणुकीतच याच आघाडीच्या काही आमदारांनी खऱ्याच्या बाजूने मतदान करून अहंकाराचा फुगा फोडला. विधानसभेच्या आगामी निवडणुकीत विरोधकांच्या अहंकाराचा फुगा पुरता फुटून जाणार आहे, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. महाराष्ट्राच्या राजकारणात शरद पवार यांनी भ्रष्टाचाराला संस्थात्मक प्रतिष्ठा दिल्याचा थेट आरोप याच मंचावरून बोलताना अमित शाह यांनी केला होता. आरक्षणासारखा सामाजिक संवेदनशील मुद्दा शरद पवारांच्या राजकारणामुळेच क्लिष्ट होत गेल्याचा आरोपही त्यांनी केला.

### मुखवटा फाडणार

केंद्रात मंत्री असताना महाराष्ट्राची सतत उपेक्षा करणाऱ्या, भ्रष्टाचारास प्रतिष्ठा देणाऱ्या आणि संवेदनशील प्रश्नांवरून समाजात तेढ माजविणाऱ्या राजकारणाचा भेसूर मुखवटा फाडण्यासाठी आम्ही आता मैदानात उतरलो आहोत. राज्यातील महायुती सरकारने आपल्या सत्ताकाळात जनहिताच्या अनेक योजना राबविल्या. त्या अपयशी व्हाव्यात यासाठी विरोधकांनी देव पाण्यात घातले आहेत. 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेवर विरोधकांनी टीका केली; पण या योजनेसाठी पात्र ठरणाऱ्या लाभार्थीकडून नोंदणीपत्रे भरून घेण्यासाठीही ते कामाला लागले. ही योजना फसविण्याच्या हेतूनेच हे सुरू असावे, या शंकेस वाव आहे. विरोधकांमार्फत दाखल केलेल्या अर्जात त्रुटी ठेवून लाभार्थींना अपात्र ठरविण्याचा आणि त्याचे खापर सरकारवर फोडण्याचा कट आखला जात असल्याची शंका फडणवीस यांनी व्यक्त केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादाला नवचैतन्य येत आहे, आणि नकारात्मकतेची बुरसट मरगळ दूर झाली आहे. भारत अधिक बलशाली होत राहिला तर आपला टिकाव लागणार नाही, या काही परकी शक्तींना वाटणाऱ्या भीतीमुळे भारतातील विरोधकांना हाताशी धरून त्यांनी चालविलेला खोटे पसरविण्याचा खेळ यापुढे चालू दिला जाणार नाही. **(प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा दै.सकाळमध्ये प्रसिद्ध झालेला लेख.)**

# प्रदेश अधिवेशन क्षणचित्रे















पुणे येथे प्रदेश अधिवेशनात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच भारतमाता आणि राष्ट्र पुरुषांच्या प्रतिमेचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

# भारताच्या भविष्यावर मोठी गुंतवणूक करणारा अर्थसंकल्प



● **देवेंद्र फडणवीस**, उपमुख्यमंत्री

> केंद्रातील नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात तिसऱ्या कार्यकाळातील पहिला अर्थसंकल्प हा अतिशय संतुलित आणि भारताच्या भविष्यावर मोठी गुंतवणूक करणारा अर्थसंकल्प आहे. याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे अभिनंदन.

**अर्थसंकल्प** सादर झाल्यानंतर विरोधी पक्षांनी महाराष्ट्राला काहीच मिळाले नाही, याची ओरड केली. संसदेच्या आवारात घोषणाबाजी करुन पुन्हा फेक नरेटिव्ह पसरविण्याचा प्रयत्न केला. मात्र, या अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला काय मिळाले, याची यादीच मी पत्रकार परिषदेत वाचून दाखविली आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काहीच मिळाले नाही असा सूर काही विरोधी नेत्यांनी लावला असून काही माध्यमांनीही त्या सुरात सूर मिसळला आहे. अर्थसंकल्प कसा समजून घ्यावा याविषयीच्या अज्ञानातून किंवा राजकारणातून हे घडू शकते. त्यामुळे या नेत्यांनी फेक नॅरेटिव्ह पसरविण्याआधी अर्थसंकल्पाचे वाचन करावे किंवा जाणकारांकडून तो समजून घ्यावा महाराष्ट्राने अलिकडेच युवकांसाठी कौशल्य विकासाची कार्यप्रशिक्षण विद्यावेतन योजना प्रारंभ केली. केंद्रीय अर्थसंकल्पात सुद्धा अशीच योजना प्रारंभ करण्यात आली आहे. १ कोटी युवकांना कौशल्य प्रशिक्षित करण्याचा मोठा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. त्यासाठी ५००० रुपये प्रतिमाह आणि ६००० रुपये एकरकमी देण्यात येणार आहेत. त्यामुळे युवा आणि रोजगार या विषयावर महाराष्ट्राला मोठाच लाभ मिळेल. याशिवाय, ३ टक्के व्याजसवलतीसह १० लाखांपर्यंत शैक्षणिक कर्ज देण्याचा निर्णय सुद्धा अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

११ लाख कोटींची भांडवली गुंतवणूक ही आतापर्यंतची विक्रमी गुंतवणूक आहे. वीजेच्या क्षेत्रात अतिशय क्रांतीकारी निर्णय घेण्यात आले आहेत. पंप स्टोरेज, अणुऊर्जा, अल्ट्रा सुपर क्रिटिकल थर्मल पॉवर प्लांट असे अनेक उपाय हाती घेण्यात आले आहेत. सामान्य जनतेला कर सवलतीतून सुमारे १७,५०० रुपयांचा दिलासा देण्यात आला आहे. शेतकरी, महिला, युवा, गरिब या चारही घटकांसाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्राला सुद्धा सिंचन, रस्ते, मेट्रोसह विविध प्रकल्पांना मोठा निधी मिळाला आहे. युवकांवर भर देणारा आणि उद्याच्या भारतावर मोठी गुंतवणूक करणारा हा अर्थसंकल्प आहे. केवळ राजकीय स्वार्थासाठी जनतेमध्ये संभ्रम

## महाराष्ट्राला काय मिळाले?

- विदर्भ मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प: ६०० कोटी
- महाराष्ट्र ग्रामीण रस्ते सुधार: ४०० कोटी
- सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक कॉरिडॉर: ४६६ कोटी
- पर्यावरणपूरक शाश्वत कृषि प्रकल्प: ५९८ कोटी.
- महाराष्ट्र कृषी आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्प: १५० कोटी
- एमयुटीपी-३ : ९०८ कोटी
- मुंबई मेट्रो : १०८७ कोटी
- दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर: ४९९ कोटी
- एमएमआर ग्रीन अर्बन मोबिलिटी: १५० कोटी
- नागपूर मेट्रो: ६८३ कोटी
- नाग नदी पुनरुज्जीवन: ५०० कोटी
- पुणे मेट्रो: ८१४ कोटी
- मुळा मुठा नदी संवर्धन: ६९० कोटी

निर्माण करून फेक नॅरेटिव्ह पसरविण्याच्या विरोधकांच्या कटाचा नवा चेहरा उघड झाला आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला मिळालेल्या भरघोस निधीचा थांगपत्ताच न लागल्यामुळे विरोधकांनी सुरू केलेल्या शेरेबाजीस भाजपाच्या ज्येष्ठ नेत्यांनी चोख उत्तर दिल्याने विरोधकांचे अर्थसंकल्पाविषयीचे अज्ञान उघडे पडले आहे. आपल्याला अर्थसंकल्पातले काही कळत नाही अशी जाहीर कबुली मुख्यमंत्रीपदावर असताना उद्धव ठाकरे यांनी दिली होती. त्यांचे हे अज्ञान आता उघड झाले आहे. अर्थसंकल्प कसा वाचावा, समजून घ्यावा याच पुस्तक मी लिहिलं आहे. हे पुस्तक उद्धव ठाकरेंनी वाचण्यास हरकत नाही. विरोधी पक्षांच्या नेत्यांनी मागणी केल्यास या पुस्तकाच्या प्रती त्यांना मोफत वितरित करण्यात येतील.

मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पांसाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत ६०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत ग्रामीण रस्त्यांच्या विकासासाठी ४०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, हरयाणा आणि उत्तर प्रदेश या राज्यांना जोडणाऱ्या मुंबई-दिल्ली औद्योगिक

## महाराष्ट्राला रेल्वे विभागासाठी काय मिळाले?

**अर्थसंकल्पातील तरतूद**

- २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात : १५,९४० कोटी
- २००९ ते २०१४ : ११७१ कोटी
- (२००९ ते २०१४ पेक्षा १३.५ पट)

**एकूण कामे**

**नवीन मार्ग**

- २००९ ते २०१४ : ५८ कि.मी.
- २०१४ ते २०२४ : १८३ कि.मी.

**विद्युतीकरण**

- २००९ ते २०१४ : ० कि.मी.
- २०१४ ते २०२४ : ३५१ कि.मी.

**नवीन प्रकल्प**

- एकूण ४१ प्रकल्प, ५८७७ कि.मी., ८१,५८० कोटी
- अमृत भारत स्थानक विकास: महाराष्ट्रातील १२८ स्थानके
- रेल्वे उड्डाणपूल आणि अंडरब्रीज : २०१४ पासून ९२९

कॉरिडॉरसाठी ४९९ कोटी, तर बंगळुरू-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरसाठी ४६६ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ज्येष्ठ भाजपा नेते व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा महत्वाकांक्षी असलेला नाग नदी पुनरुज्जीवन प्रकल्प आता गति घेणार असून केंद्र सरकारने या प्रकल्पाकरिता ५०० कोटींच्या निधीची तरतूद केली आहे. मुंबई, पुणे येथील मेट्रो प्रकल्पांकरिता २५८४ कोटींची तरतूद करण्यात आली असून मुंबई मेट्रो प्रकल्पाकरिता एक हजार ८७ कोटी, नागपूर मेट्रोकरिता ६८३ कोटी तर पुणे मेट्रोकरिता ८१४ कोटी रुपये देण्यात आले आहेत. मुंबईकरिता महत्वाच्या असलेल्या एमयूटीपी-३ प्रकल्पाकरिता तरतूद करण्यात आलेल्या ९०८ कोटींच्या निधीमुळे उपनगरी रेल्वेसेवेचा दर्जा अधिक उंचावण्यात येणार आहे, तर महानगर क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या विकासाकरिता दीडशे कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ■

# अर्थसंकल्प आणि मध्यमवर्गीय करदाते

● आनंद देवधर

> काही मध्यमवर्गीय करदाते आक्रोश करत आहेत. आम्हाला इन्कम टॅक्समध्ये काही फायदा करून दिला नाही, फारच थोडा फायदा झाला आहे, करोडो रुपये रेवडी वाटण्यात सरकार फुकट घालवत आहे, आमच्या पैशातून असे केलेले आम्हाला मान्य नाही, यापुढे भाजपाला मत द्यायचे की नाही याचा विचार करायला हवा, अशा पद्धतीच्या प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. धमक्या देत आहेत, हट्टाला पेटले आहेत, काहीही ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नाहीत. जर राहुल गांधी सत्तेत आला तर देशाला भिकेला लावेल याचेही भान भाजपाला धमकी देताना राहिलेले नाही.

**एक** उदाहरण देतो. समजा दहा जणांनी पिकनिक काढली. त्यासाठी प्रत्येकी खर्च १ हजार रुपये ठरला. दहा हजार रुपये जमले. त्यातून काही रक्कम नॉनव्हेजसाठी खर्च झाली. व्हेज खाणारे जर असे म्हणू लागले की आमच्या पैशातून नॉनव्हेजसाठी खर्च का केला. तर ग्रुपमध्ये काय होईल? एक ग्रुप म्हणून जेव्हा पिकनिक जातो त्यावेळी अशा गोष्टींना किती महत्त्व द्यायचे हे ज्याचे त्याला कळायला हवे. इतकी चिंधीगिरी करून चालेल का?


जे इन्कम टॅक्स भरतात त्यांनी एक गोष्ट समजून




घ्यायला पाहिजे की त्यांनी भरलेला इन्कम टॅक्स हा सरकारच्या गंगाजळीत जमा होतो. जसा इन्कम टॅक्स जमा होतो तसाच जीएसटी, कस्टम्स ड्युटी, एक्साईज ड्युटी आणि इतर कर जमा होतात. या जमा झालेल्या रकमेतून गरिबांना अन्नपुरवठा केला जातो. पण फक्त अन्नपुरवठा केला जातो का? नाही. सरकारला ज्या ज्या प्रकारे आलेली रक्कम खर्च करायची असते त्या त्या प्रकारे ती केली जाते. गरिबांवर केलेला खर्च हा फक्त एक लहानसा भाग असतो.

आपल्यापैकी कोणीही आपली रक्कम अमुक एका प्रकारे खर्च झाली असे गृहीत धरणे योग्य नाही. मी दिलेल्या पैशातून गरिबांना रेवडी वाटली असे अनुमान तुम्ही कसे काढू शकता? शिवाय दरवर्षी सरकारला काही हजार कोटी रुपयांचे कर्ज काढावे लागते. कशावरून त्या कर्जातून रेवडीसाठी पैसे खर्च झाले नाहीत? हिशोब आलेल्या सर्व रकमेचा केला जातो तुम्ही दिलेल्या इन्कम टॅक्सचा थेट संबंध एखाद्या ठराविक खात्याशी जोडणे हे साफ चूक आहे. खरे तर. जाऊ दे...

You cannot isolate,presume and corelate your taxes with a particular head of expenditure. That is absolutely misplaced.




तुमच्या मनात असे कधी का येत नाही की मी दिलेल्या इन्कम टॅक्समधून सियाचीन सीमेवर गस्त घालणाऱ्या जवानांना आधुनिक शस्त्रास्त्रे पुरवली गेली. मी दिलेल्या जीएसटीमधून नॉर्थ ईस्टमध्ये उत्तम रस्ते बांधण्यात आले. मी भरलेल्या एक्साईज ड्युटीमधून आयआयटी, आयआयएम उभारण्यात आली. दरवेळी माझ्या करामधून फुकट अन्न दिले गेले असेच रडगाणे गात बसायचे? कहर करता तुम्ही. प्रत्येक वेळी स्वतःला भराव्या लागलेल्या इन्कम टॅक्सची सांगड ज्या गोष्टींवर सहज टीका करू शकता येते अशा खर्चाची घालण्याची ही सवय माझ्या मते अत्यंत अयोग्य आहे.

कोणत्याही पक्षाचे सरकार असो आलेल्या रकमेपैकी ठराविक रक्कम ही कल्याणकारी योजनांसाठी वापरली जातेच. कोणत्याही सरकारचे ते कार्य आहे, कर्तव्य आहे. प्रश्न त्याच्या योग्य विनिमयाचा असतो. त्यात कुठेही भ्रष्टाचार होत नाही, गळती लागत नाही हे महत्त्वाचे असते. केंद्रीय अर्थसंकल्पात कर आणि कर्ज मिळून एकूण जमा रकमेच्या फक्त ८% टक्के रक्कम केंद्रीय योजनांवर खर्च झाली आहे. मोफत अन्नधान्य योजना ही या सर्व योजनांपैकी एक आहे. जमा झालेल्या एकूण करसंकलनाचा गोषवारा असा आहे. १९% इन्कम टॅक्स,१७% कंपनी इन्कम टॅक्स, १८% जीएसटी ५% एक्साईज ड्युटी,४% टक्के कस्टम्स ड्युटी ही झाली टक्केवारी. आता किती रक्कम जमा झाली आणि खर्च झाली ते बघा

**३५०४३३४.५३ कोटी रुपये एकूण कर संकलन**

**२०५२५० कोटी रुपये मोफत अन्न योजनेची तरतूद.**

### उरलेले पैसे कुठे गेले?

जिथे खर्च करायचे त्या सर्व खात्यांवर व्यवस्थित खर्च होत आहे. संरक्षण, शेती, महिला, तरुण, उद्योग, रस्ते, रेल्वे, विमानतळ, बंदरे, शिक्षण अशा सर्व महत्त्वाच्या खात्यांवर, क्षेत्रांवर केलेला खर्च आपण दुर्लक्षित करतो आणि केवळ एका लहानशा टक्केवारीवर लक्ष केंद्रित करतो. याचे कारण काय? आपल्या पैशावर गरीब अन्न खातात हा समज. तुम्ही त्याला रेवडी रेवडी म्हणत आहात ते वस्तुतः रेवडी नसून सरकारचे minimal social obligation आहे. अशा कारणांवर वारेमाप खर्च करणे ही आर्थिक बेशिस्त आहे. उधळण आहे. पण मोदी सरकार तसे करत आहे का? मोफत अन्नवाटपावरचा खर्च अनावश्यक आहे, खर्च वारेमाप आहे, ही धडधडीत आर्थिक बेशिस्त आहे, सरकारचे आर्थिक धोरण देशाला खड्ड्यात घालणारे आहे असे जर सिद्ध करता आले तर तुमचे सगळे आक्षेप मान्य आहेत परंतु वस्तुस्थिती काय आहे ते जरा समजून घेणार का? हा सर्व खर्च करूनही सरकारने वित्तीय तूट आटोक्यात ठेवली आहे.

Government has maintained exemplary fiscal discipline. Next year's target of fiscal deficit is 4.5% which is more than reasonable. In fact it is very good.

अर्थशास्त्र आणि राजकारण यांचे कधी जुळत नाही हे एव्हाना सुशिक्षित जनतेला माहित असायला हवे. राजकारण करताना अर्थशास्त्राकडे दुर्लक्ष होणार नाही याची काळजी घेण्याइतकी अक्कल मोदी सरकारला आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थशास्त्रालाच प्राधान्य देऊन अर्थसंकल्प सादर केला आहे. म्हणून तर या रेवडीबद्दल चकार शब्दही न काढता सगळ्या अर्थतज्ज्ञांनी, उद्योगपतींनी या अर्थसंकल्पाला सात ते आठ गुण दिले आहेत आणि तुम्ही रेवडीमध्ये अडकून पडला आहात. इतका चांगला अर्थसंकल्प सादर करूनही मध्यमवर्गाला काही दिले नाही या विरोधकांच्या नॅरेटिव्हमध्ये पुन्हा एकदा अडकून पडले आहात. रेवडीसाठी राखीव रक्कम ही एकूण अर्थसंकल्पाच्या तुलनेत खूप कमी आहे. हट्टाला पेटून जर कोणी 'माझ्या करातून का फुकट अन्न देता? असे विचारणार असेल तर साफ दुर्लक्षच केलेले बरे. रेवडीचा पर्वत करण्याची काहीही जरूर नाही.

**(लेखक हे सनदी लेखापाल आहेत.)**

# विधानसभा निवडणुकीपूर्वी मतदार याद्यांत दुरुस्ती करा



**विधानसभा** निवडणुकीपूर्वी लोकसभा निवडणुकीच्या मतदार याद्यांतील दोष दूर करावे, अशी विनंती भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्तांकडे केली आहे. लोकसभा निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार याद्यांमध्ये गंभीर त्रुटी असल्याने महाराष्ट्रातील सुमारे १० टक्के मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहिले, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले. मतदान केंद्र सुसूत्रीकरण व नवीन मतदान केंद्र तयार करताना अस्तित्वात असलेल्या मतदान केंद्रांच्या याद्या तोडून तेथील नावे दुसऱ्या मतदान केंद्रांमध्ये टाकण्यात येऊ नयेत, मतदान केंद्राच्या ठिकाणीच वाढीव मतदान केंद्र त्याच इमारतीत मंजूर करावे, धुळे आणि मालेगावमध्ये ३ हजार मतदारांच्या नोंदणीमध्ये झालेल्या घोळा प्रकरणी दोन्ही ठिकाणच्या निवडणूक अधिकाऱ्यांना निलंबित करावे आणि जिल्हाधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणीही पक्षातर्फे करण्यात आल्याचे श्री. बावनकुळे यांनी सांगितले.

नवी दिल्लीत केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त तसेच प्रदेशाध्यक्ष श्री. बावनकुळे, मुंबई अध्यक्ष आ. आशीष शेलार तसेच माजी खासदार किरीट सोमय्या यांच्यात सुमारे सव्वा तास चर्चा झाली. यावेळी श्री. बावनकुळे यांनी एक निवेदन त्यांना दिले. भेटीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना श्री. बावनकुळे म्हणाले की, महाराष्ट्रातील बूथ आणि मतदार यादीत असणाऱ्या त्रुटीबद्दल निवडणूक आयोगाला माहिती दिली. २०१९ साली एका मतदारसंघातील दीड लाख मते २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत नव्हती. यासाठी आम्ही नागपूर लोकसभा क्षेत्राचे उदाहरण या निवेदनातून दिले आहे.

> लोकसभा निवडणुकीत अनेक मतदार संघात भाजपा समर्थक मतदारांची नावे वगळ्यात आल्याच्या तक्रारी होत्या. तसेच एकाच कुटुंबातील मतदारांची नावे दोन वेगवेगळ्या मतदान केंद्रात असल्यामुळे अनेकांना मतदान करण्यात अडचणी आल्या. या सर्व अडचणींबाबत राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी व केंद्रीय निवडणूक आयोगाला प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यातर्फे नुकतेच निवेदन देण्यात आले आहे.

### मतदार यादी करा एक हजारांची

ते पुढे म्हणाले की, मतदार याद्या तयार करताना डाटा एन्ट्रीच्या परिस्थितीविषयी माहिती दिली. सोबतच एका बूथवरील मतदार यादी एक हजार मतदारांची करावी अशी विनंती केली. तसेच वयोवृद्ध मतदारांचे वय ८५ वरून ७५ करण्यात यावे तसेच हाऊसिंग सोसायटीमध्ये १०० टक्के बूथ लावण्याची मागणी केली. एकाच इमारतीतील बूथ शेजारी लावण्यात यावे.

### आयुक्तांचे त्रुटीवर लक्ष!

बूथ लेव्हलच्या अधिकाऱ्यांकडून चुका झाल्याचे मुख्य निवडणूक आयुक्तांच्या लक्षात आल्याचे दिसून आले. फोटो नसल्याने अनेकांना मतदान करता आले नाही, हे देखील त्यांना पटवून दिले. आगामी विधानसभा निवडणूक चांगली होईल व मतदारांना मतदानाचा हक्क बजाविता येईल, अशी अपेक्षा त्यांनी निवडणूक आयुक्तांकडे व्यक्त केली. शहरांतील मतदारयाद्या सदोष असून निवडणूक आयोग कार्यालयात बसून तांत्रिकरित्या मतदार याद्यांचे विभाजन केल्याने शहरांमध्ये लोकसभा निवडणुकीवेळी मतदानाचा टक्का घटला होता. आता विधानसभा निवडणुकी आधीही तीच चूक आयोग करत आहे असेही आम्ही निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे. लोकसभा निवडणुकीवेळी ज्या मतदान केंद्रांवर १५०० पेक्षा अधिक मतदारांची संख्या होती ती संख्या कमी करण्याच्या उद्देशाने सध्या आयोगाचे काम सुरू आहे. मात्र असे केल्यास एकाच वसाहतीतील मतदारांची नावे वेगवेगळ्या मतदान केंद्रात समाविष्ट होऊन मतदानाच्या दिवशी मतदारांना आपापले मतदान केंद्र शोधण्यात अडचणी येतील. ज्या मतदान केंद्रावर मतदार संख्या कमी असेल तिथे जास्त मतदारसंख्या असलेल्या मतदान केंद्रावरील मतदारांची नावे समाविष्ट केल्यास मतदारांचा गोंधळ उडेल. परिणामी मतदानाचा टक्का घसरेल, अशी भीती या पत्रातून व्यक्त केल्याचे श्री. बावनकुळे यांनी नमूद केले.

तसेच धुळे आणि मालेगाव लोकसभा आणि विधानसभेत अशा ३ हजारांहून अधिक मतदारांचे ओळखपत्र, नाव आणि छायाचित्रे एकच असताना निवडणूक आयोगाने याकडे लक्ष का दिले नाही, असा सवाल ही श्री. बावनकुळे यांनी उपस्थित केला. धुळ्यात मतदार म्हणून तीन हजार लोकांची नावे असून, मालेगावमध्येही त्याच लोकांची नावे असल्याचे सांगत श्री. बावनकुळे यांनी या घोळा प्रकरणी धुळे, मालेगावच्या निवडणूक अधिकाऱ्यांना निलंबित करावे आणि जिल्हाधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

श्री. बावनकुळे यांनी मुंबई भाजप अध्यक्ष आ. आशिष शेलार, माजी खासदार किरीट सोमय्या, खा. डॉ. हेमंत सावरा व खा. अनूप धोत्रे यांच्यासोबत मुख्य निवडणूक आयुक्तांची भेट घेतली. यावेळी त्यांनी लोकसभा निवडणुकीतील घटलेले मतदान व सदोष मतदार याद्या हे मुद्दे मांडले. श्री. बावनकुळे यांनी नागपूरचे उदाहरण देत लोकसभा निवडणुकीत १ लाखाहून अधिक मतदार कमी झाल्याचे निदर्शनास आणून दिले. २०१९ मध्ये ज्यांनी मतदान केले, असे अनेक मतदार २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मतदान करू शकले नाहीत. ३६ हजार मतदारांची नावे पूर्णतः काढून टाकल्याने ते मतदानापासून वंचित राहिले. शिवाय राजकीय पक्षांकडून सर्व माहिती दिल्यावरही नवीन मतदारांची नावे यादीत समाविष्ट झाली नाहीत. मतदार याद्यांच्या डेटा एंट्रीत होणाऱ्या त्रुटींसह मतदान प्रक्रिया सुलभ व्हावी व मतदारांना मतदान करणे अडचणीचे होणार नाही याबाबत प्रयत्न करावे, अशी मागणी करण्यात आली. मुख्य निवडणूक आयुक्तांनी या संपूर्ण मुद्द्यावर सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याची माहिती श्री. बावनकुळे यांनी दिली. ■

### मतदार यादी करा एक हजारांची

- एका बूथवरील मतदार यादी एक हजार मतदारांची करावी, अशी विनंती बावनकुळे यांनी केली.
- सोबतच वयोवृद्ध मतदानचे वय ८५ वरून ७५ करण्यात यावे, तसेच हाऊसिंग सोसायटीमध्ये १०० टक्के बूथ लावण्याची मागणी केली.

### राज्याच्या आयुक्तांकडून प्रतिसादच नाही

- मतदार याद्यातील त्रुटींची माहिती महाराष्ट्र राज्य मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोकलिंगम यांना देण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.
- परंतु, त्यांनी प्रतिसाद दिला नसल्याने केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मुख्य निवडणूक आयुक्त यांची भेट घ्यावी लागली, असे सांगण्यात आले.

# रक्ताच्या नात्यापलीकडचे नाते!



● **चंद्रशेखर बावनकुळे**, प्रदेशाध्यक्ष

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा 'दै. पुण्यनगरी'मध्ये प्रसिद्ध झालेला लेख.

**राजकारण** हे जसे लोकसेवेचे माध्यम आहे तसेच ते जनसंपर्काचे सशक्त साधनदेखील आहे. जनसंपर्कातून नव्या ओळखी होतात, नवी माणसे भेटतात. त्यांच्यापैकी काहींशी जन्माचे ऋणानुबंध जुळतात, पक्की नाती तयार होतात. ही नाती रक्ताच्या नात्यापलीकडची असतात. असेच एक नाते मला सापडले ते म्हणज, देवेंद्र फडणवीस यांचे! देवेंद्रजी आणि माझा परिचय मागील ३२-३३ वर्षांपासूनचा. मी अतिशय सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून आलो आहे. भारतीय जनता पार्टीत मी कार्यकर्ता म्हणून काम करायला सुरुवात केली; तेव्हा माझ्यातील कार्यकर्त्याला घडवले, मला संस्कारित केले आणि माझ्या कारकीर्दीला नवा आयाम देण्याचे काम केले ते ज्येष्ठ नेते श्री. नितीन गडकरी यांनी. नितीनजी आणि माझ्या वयात बरेच अंतर आहे; त्यामुळे मी कायमस्वरूपी त्यांना पितृस्थानी मानतो. बापाचा एकप्रकारचा धाक असतो आणि त्याच्याशी अनेक गोष्टी बोलता येत नाहीत; त्या भावासोबत सहजपणे बोलता येतात. राजकारणात माझ्या भावाची भूमिका जर कुणी पार पडली असेल तर ते देवेंद्रजींनी! त्यांनी भावाने करावी तशी माझी पाठराखण केली. २००४ मध्ये पहिल्यांदा आमदार झालो, तेव्हा राजकारणात कार्यकर्ता व आंदोलनाचा मोठा अनुभव असूनही विधिमंडळाच्या कामकाजाचे बारकावे माहिती नव्हते. त्यावेळी देवेंद्रजींनी विधिमंडळातील कामकाज कसे हाताळायचे, प्रश्न, लक्षवेधी कशा प्रभावीपणे मांडायच्या हे समजावून सांगितले. आपल्या मतदारसंघाच्या विकासासाठी सरकारी निधी कसा खेचून आणायचा, यासाठी वेगवेगळी संसदीय आयुधे आणि जे कौशल्य लागते त्याबाबत देवेंद्रजी मला वेळोवेळी सांगायचे. या सगळ्या टप्प्यात व प्रवासात देवेंद्रजींचे मार्गदर्शन व सोबत मला नेहमी लाभत आली आहे. २०१४ मध्ये देवेंद्रजी मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांच्या मंत्रिमंडळात मला ऊर्जामंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. ही संधी अनपेक्षितपणे मिळाली. माझी ऊर्जामंत्री म्हणून ५ वर्षांची कारकीर्द त्यांच्या सोबतीनेच केवळ यशस्वी झाली. त्याचदरम्यान माझ्याकडे उत्पादन शुल्क हे महत्त्वाचे खातेही त्यांनी सोपवले. एकवेळ अशी आली की, त्यांनी मला नागपूर जिल्ह्याच्या पालकमंत्री पदासोबतच भंडारा आणि गोंदिया जिल्ह्याचेही पालकमंत्री पद दिले. राजकीय व्यक्तीने मल्टिटास्किंग असावे, हे देवेंद्रजींचे वाक्य लक्षात राहायचे. त्यातूनच एकाचवेळी विविध कामांचा आढावा घेण्याची सवय मला लागली. त्या ५ वर्षांच्या काळात अनेक प्रशासकीय बारकावे त्यांनी मला शिकवले. नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास जपानच्या प्रसिद्ध विद्यापीठाच्या मानद डॉक्टरेटपर्यंत

पोहोचला तो अतिशय कष्ट, कल्पकतेने! ते स्वप्न बघतात आणि पूर्ण करण्यासाठी ते ध्येयाने झटतात. सुमारे २५ वर्षांपूर्वी बघितलेले समृद्धी महामार्ग हे या स्वप्नांचे महत्तम उदाहरण आहे. तिसऱ्या मुंबईचे अस्तित्व खुणावणारा अटल सेतू हा प्रकल्प याच विश्वसनीय ध्येयाचा आविष्कार आहे. राष्ट्रीय प्रकल्प असलेल्या गोसेखुर्द प्रकल्प तरुणांना रोजगार देणारा, पर्यटन विकासाला चालना देणारा प्रकल्प व्हावा, यासाठी देवेंद्रजींचे प्रयत्न दूरगामी आहेत. राज्याच्या इतिहासातील दुसरे सर्वात तरुण मुख्यमंत्री झाले. २०१९ मध्ये संपलेल्या त्यांच्या कार्यकाळात त्यांनी विकास, पारदर्शकता आणि प्रशासनातील बदलांना प्राधान्य दिले.



विकासाची स्पष्ट दृष्टी, निश्चित दिशा आणि कोणताही व्यक्तिगत स्वार्थ न बाळगता काम करत राहण्याचा स्वभाव ही या लोकनेत्याची कुशलता आहे. म्हणूनच देवेंद्रजी हे माझ्यासाठी श्वास आणि ध्यास आहेत. माझ्या सुख-दुःखात, माझ्या आयुष्यातील प्रत्येक कठीण प्रसंगात देवेंद्रजी माझ्यासोबत होते, आहेत आणि राहतील, हा विश्वास अनेक वर्षांच्या ऋणानुबंधातून मला आलेला आहे. या माझ्या लोकनेत्याला वाढदिवसानिमित्त शुभेच्छा.

### भाजपा जनतेला बांधील

जगाच्या इतिहासात नोंद व्हावी, इतके देवेंद्रजींच्या धाडसी निर्णयाचे प्रभावी प्रत्यंतर मला आले ते एलिफंटा केव्हज म्हणजे घारापुरी लेण्यात वीज पोहोचवण्याच्या प्रयत्नांवेळी.! स्वातंत्र्याच्या ७० वर्षांनंतर, २०१८ मध्ये युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ यादीत असलेल्या एलिफंटा लेणीचे अखेर विद्युतीकरण झाले. तो दिवस प्रकाशाने भारला होता. झगमगणाऱ्या मुंबईपासून अवघ्या १० किमी अंतरावर असलेल्या आणि भगवान शिवशंकराशी संबंधित अनेक पुरातत्त्व अवशेषांनी युक्त असलेल्या या ठिकाणी आम्ही वीज पोहोचवली. या अद्भुत लेण्यापर्यंत वीज न्यायला इतकी वर्षे लागावी. अनेक सरकारे आली-गेली. पण त्या ठिकाणाचा अंधार दूर होण्यासाठी देवेंद्रजींचे सरकार भगवान शंकराला आणावे लागले, असेच मी म्हणेन. ही बाब जगाच्या इतिहासात नोंद व्हावी, इतकी प्रभावी आहे. अरबी समुद्राखालून विजेच्या केबल्स मोठ्या चमत्कारिक पद्धतीने पोहोचवल्या. असे अनेक विलक्षण प्रकल्प नियोजनबद्धरीत्या देवेंद्रजींनी पूर्ण केले. शेतकऱ्यांना वीज देण्यापासून, सौरऊर्जेच्या प्रकल्पाची गरज अधोरेखित करेपर्यंत अनेक विषय देवेंद्रजींनी राज्याच्या विकासासाठी पूर्ण केले. विशेष म्हणजे, माझे आराध्यदैवत असलेल्या कोराडी येथील आई जगदंबा देवस्थानाच्या विकासासाठी जो शासकीय निधी मी आणू शकलो त्याचे मोठे श्रेय देवेंद्रजींना आहे. आईच्या सेवेसाठी व मंदिरासाठी निधी कमी पडू द्यायचा नाही हे त्यांनीच मला सांगितले होते. आज ते मंदिर व परिसर बघायला दूरदूरून लोक येतात. राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी या मंदिराला भेट दिली. २०१९ च्या निवडणुकीत तब्बल ३२ विधानसभा मतदारसंघांची जबाबदारी देवेंद्रजींच्या पुढाकाराने मला मिळाली, नंतर प्रदेशाचे महामंत्रीपद मिळाले. हा सगळा प्रवास सुरू असताना अनपेक्षितपणे २०२२ मध्ये भारतीय जनता पार्टीचा प्रदेशाध्यक्ष म्हणून फार मोठी जबाबदारी मा. नरेंद्रजी मोदी, मा. अमितभाई शाह, मा. जे. पी. नड्डा यांनी मला दिली. या सगळ्या जबाबदारीमागे एका व्यक्तीचे पाठबळ आहे ते म्हणजे



**देवेंद्रजीची अनेक वैशिष्ट्ये, बारकावे आहेत.कोणताही मुलाहिजा न ठेवता ते कठोर निर्णय घेऊ शकतात. लोकहितापुढे ते सर्व मोह त्यागू शकतात. समर्पण, त्याग, न्यायीवृत्ती ही त्यांची स्वभाववैशिष्ट्ये मला जाणवली. मैत्री कशी जपावी, याचा ते वस्तूपाठ आहेत. शब्द देतानाच तो पाळण्याचे बंधनही ते स्वत: ला घालून घेतात. त्याचबरोबर राजकारणात असावी लागणारी गुप्तता हा विशेष गुण त्यांच्यात आहे. माझा तरी अनुभव हाच आहे ते एका शब्दानेही प्रेम व्यक्त करत नाहीत, पण त्यांचा आधार हीच त्यांच्या सोबतीची खरी जाणीव असते.**

देवेंद्रजी! ही जबाबदारी मी त्यांच्या सूचनेनुसार व समन्वयाने पार पाडत आहे. देवेंद्रजींनी मला प्रदेशाध्यक्ष म्हणून काम करताना पूर्ण स्वातंत्र्य दिले. एक गोष्ट ते कटाक्षाने पाळतात, शासन आणि पक्ष यात सरमिसळ कधी करत नाहीत. आपल्या पक्षाचे सरकार सत्तेवर असले तरी पक्ष म्हणून आपले स्वतंत्र अस्तित्व आहे आणि भाजपा हा सरकारला नाही तर जनतेला बांधील आहे, असे त्यांचे नेहमी सांगणे आहे. त्यामुळे पक्ष सरकारमध्ये असला तरीही लोकांचे प्रश्न मांडताना प्रसंगी सरकारशी संघर्ष करायची तयारीदेखील असली पाहिजे, हे ते नेहमी सांगत असतात. कृषी सुधारणा, शहरी विकास, पोलीस दल मजबुतीकरण, सार्वजनिक सुरक्षेला प्रोत्साहन, सायबर गुन्हे आणि दहशतवाद यासारख्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी पावले उचलून कायदा व सुव्यवस्था बळकट करण्याला प्राधान्य, जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून जलविकास, ऊर्जा क्षेत्रातील सुधारणा अशी थक्क करणारी कामगिरी त्यांची आहे.

### साधेपणा यशाचे गमक

१० वर्षांपूर्वी देवेंद्रजींनीसुद्धा प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी अतिशय दमदारपणे सांभाळली होती. त्यादरम्यानचा त्यांचा अनुभव यावेळी मला त्यांनी सांगितला आणि त्यातूनच आताचे संघटन मार्गक्रमण करत आहे. गेल्या ३० वर्षापेक्षा अधिक काळात मला त्यांच्याकडून एक गोष्ट शिकता आली ती म्हणजे, लोकप्रतिनिधी म्हणून तुम्हाला यशस्वी व्हायचे असेल तर तुम्ही अभ्यासू व चौकस असले पाहिजे. लोकांचे प्रश्न सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिकदृष्ट्यासुद्धा तुम्हाला कळले पाहिजेत. कारण प्रशासनाच्या माध्यमातून ते प्रश्न जेव्हा तुम्ही सोडवता तेव्हा हेच अध्ययन तुमच्या कामी येते. मी तीनदा कामठी मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. आता विधान परिषद सदस्य आहे. भारतीय जनता पार्टी देशातील, जगातील सगळ्यात मोठे संघटन म्हणून नावलौकिक मिळवलेल्या संघटनेचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मला मिळाली; हे मी माझे भाग्य समजतो.

राज्याच्या विकासासाठी देवेंद्रजी आज अहोरात्र झटत आहेत. हाती घेतलेले काम झपाट्याने पूर्ण करत असताना सोशल मीडियाच्या माध्यमातूनही ते जनतेशी जुळले आहेत. राज्यातील रस्ते, वीजपुरवठा, उद्योग, सिंचन या बाबी राज्याचा विकासदर निश्चित करण्यासाठी कामी येत असल्या तरी, गरीब-सर्वसामान्य, तळागाळातील नागरिकांच्या चेहऱ्यावरील आनंद हाच प्रगती मोजण्याचा मापदंड असतो. म्हणूनच, देवेंद्रजी आधुनिकतेची कास धरताना गरीबांच्या विकासाची काळजी घेतात. गरीबांच्या घराच्या योजना, अन्न-धान्यांची काळजी, आरोग्य व्यवस्था या सगळ्यांवर त्यांची नजर आहे. जेव्हा-जेव्हा पक्षाच्या कोअर समितीची बैठक असते, त्या वेळी सर्व सहकाऱ्यांना, पक्षातील प्रमुख पदाधिकाऱ्यांना याबाबत सूचना करतात. पाठपुरावा करतात. विलक्षण बुद्धिमत्ता, अचाट बुद्धिसामर्थ्य आणि अंगात टिकून असलेला साधेपणा हे त्यांच्या यशाचे गमक आहे. साधेपणा इतका की, गेट वे ऑफ इंडियासमोर यंदा झालेल्या 'महाराष्ट्र भूषण' कार्यक्रमात आशाताई भोसले यांना स्टेजवरच्या



समृद्धी महामार्ग



अटल सेतू





मुंबई मेट्रो

पोडियमसमोर असलेल्या फुलांच्या गुच्छामुळे समोरील श्रोत्यांशी संवाद साधताना अडचण येत होती. हा गुच्छ काढा, अशी आशाताईंनी विनंती केली आणि तत्काळ स्टेजवर बसलेल्या देवेंद्रजींनी पुढाकार घेत तो गुच्छ कार्यकर्त्याच्या भूमिकेत येत काढून टाकला. हा क्षण फार मोलाचा होता. ती सहजता मनावर कोरून गेली. कुणी कार्यकर्ता, स्वयंसेवक येईल आणि तो गुच्छ काढून टाकेल, असा विचारही त्यांनी केला नाही की, आपण राज्याचे उपमुख्यमंत्री आहोत हे उपस्थितांना जाणवूही दिले नाही, त्यांच्यातील हा साधेपणा त्यांच्यातील नम्रता तर दाखवतोच पण कार्यकर्ता अंगात आहे, हे ही दिसते.

त्यांच्या स्वभावातील एक वेगळेपण म्हणजे कोणत्याही भूलथापांना हा माणूस भूलत नाही. खोट्या प्रशंसेला हा माणूस कधी शरण जात नाही, आणि त्यांच्या वागण्या- बोलण्यात एक तटस्थपणा असतो मी तुझ्यावर खूप प्रेम करतो ' किंवा 'मी तुझ्या सोबत आहे','मी तुझ्या पाठीशी आहे ' असली पोकळ वाक्ये ते बोलून दाखवत नाहीत, ते त्यांच्या कृतीतून दिसते.

सिंचनाच्या क्षेत्रातील देवेंद्रजींचा अभ्यास चकित करणारा आहे. पायाभूत सुविधा, अर्थकारण आणि वीज हे विषय त्यांना आवडतात. जनतेला सोयी मिळाव्यात यासाठी हाती घेणाऱ्या प्रकल्पांची अमलबजावणी करतानाच त्यांचे तारीखनिहाय नियोजनही देवेंद्रजींचे तयार असते. वर्सोवा-विरार सीलिंक, मेट्रो ११, मुंबई पूर्वव्यवस्थापन प्रकल्प, एमटीएचएलमुळे तयार होणाऱ्या तिसऱ्या मुंबईत बांधकाम क्षेत्रात समिटोमोची गुंतवणूक, पुण्यात स्टार्टअप हब विकसित, सेमिकंडक्टर क्षेत्रातील गुंतवणूक, मुंबईचा कोस्टल रोड अशी अनेक उदाहरणे त्यांच्या दूरदृष्टीची प्रचिती देतात.

दीर्घायुष्य मिळो आणि त्यांच्या हातून जनतेची सेवा घडो; त्यांची प्रगती हीच आमच्यासाठी आनंदाची कुपी आहे. मला आठवते, आपले लाडके पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांनी नागपूरने महाराष्ट्राला दिलेली भेट..' असे देवेंद्रजींचे वर्णन केले. माझ्या अनुभवानुसार ते वर्णन किती यथार्थ आहे, हे कळते.

**(शब्दांकन: रघुनाथ पांडे, मीडिया हेड, मा. प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र)**

# संविधानाच्या मारेक-यांकडून संविधानाचा 'जयघोष'



● विश्वनाथ रा. सुतार

> १८ व्या लोकसभेवर निवडून गेलेल्या नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी सोहळा मी संसद टीव्हीवर पाहात होतो. या शपथविधी सोहोळ्याच्या प्रसंगी एक गंमतीदार दृश्य पाहायला मिळाले ते म्हणजे काँग्रेस व इतर काही विरोधी पक्षाचे खासदार शपथविधीसाठी येताना हातात संविधानाची प्रत घेऊन येत होते. यातून त्यांना हे दर्शवायचे होते की आम्ही मोदी सरकारपासून संविधान वाचवण्याचे काम करणार आहोत. कारण मोदी सरकार घटना बदलणार आहे, घटनेची मोडतोड करणार आहे म्हणून आज आम्ही भारतीय घटनेचे रक्षक म्हणून आमची भूमिका बजवायला इथे आलो आहोत.

**पण** या काँग्रेस पक्षाचा पूर्वेतिहास पाहता यांनी स्वतः शेकडो वेळा भारतीय राज्य घटनेची कशी मोडतोड केली आहे आणि अनेकदा आपल्या सोयीनुसार घटना वाकवून या देशावर कसे शासन केले आहे यापैकी काही मोजक्याच घटनांची मी या ठिकाणी आठवण करुन देऊ इच्छितो:

१९५० साली भारतीय राज्य घटना लागू झाली त्याच्यानंतर १-२ वर्षातच जम्मू काश्मीरला वेगळा दर्जा देणारा कलम ३७० व ३५ए ही दोन कलमं कुठलीही संसदीय प्रक्रिया न करता घटनेत घुसवली गेली आहेत. ३५ए नुसार जम्मू काश्मीर राज्याचे नागरिकत्व ठरवण्याचा अधिकार भारतीय संसदेकडून काढून घेऊन तो अधिकार जम्मू काश्मीर विधानसभेला देण्यात आला होता. हा घटनेच्या मूळ भावनेवर व देशाच्या अखंडतेवर केला गेलेला पहिला कुठिराघात होता. १९५७ साली केरळमध्ये लोकशाही मार्गाने निवडून आलेले कम्युनिस्टांचे सरकार

हुकुमशाही पद्धतीने बरखास्त केले गेले यानंतर शेकडो वेळा कलम ३५६ चा दुरुपयोग करत राज्यातील विरोधी पक्षांची सरकारे बरखास्त केली गेली काँग्रेसच्या या हुकुमशाही कारभाराबद्दल अनेकदा न्यायालयांनी काँग्रेस सरकारला लाथाडले आहे पण म्हणतात ना 'निर्लज्जम सदा सुखी' म्हणून काँग्रेस पक्षाने यापासून कधीच धडा घेतला नाही मागच्या पानावरुन काँग्रेस सरकारचे हे धंदे पुढे असेच चालू राहिले. मोदी सरकार घटना बदलणार बदलणार अशी जी बोंबाबोंब ही ढोंगी मंडळी करत आहेत त्या सर्वांना, इंदिराजींनी १९७१ साली पाशवी बहुमताच्या बळावर जी २४ वी घटना दुरुस्ती केली होती त्याचा उद्देश काय होता हे माहित आहे का?

भारतीय राज्यघटनेच्या कुठल्याही भागात दुरुस्ती करण्याचा अधिकार संसदेला देणारा कायदा इंदिराजींनी पास करुन घेतला होता. घटनेत दुरुस्त्या करण्याचा अधिकार संसदेला जरुर आहे पण घटनेच्या मूळ चौकटीत बदल करण्याचा अधिकार कोणालाच नाही भले संसदेत तुमचे ५०० खासदार असले तरी तुम्हाला तसे करता येणार नाही पण या तरतुदीलाच नख लावण्याचा उद्योग इंदिराजींनी २४ व्या घटनादुरुस्तीद्वारे केली होती. ती दुरुस्ती काय म्हणते ते मी थोडक्यात मांडतो:

ccording to 24 th ammendment of 1971 Parliament can ammend any part of the constitution including fundamental rights.

आता बोला.

पण भारतीयांच्या सुदैवाने १९७३ साली केशवानंद भारती खटल्याचा निकाल देताना सुप्रीम कोर्टाने आपल्या निकालपत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे की घटनेच्या मूळ चौकटीत बदल करण्याचा अधिकार अर्थात घटना बदलण्याचा अधिकार कोणालाच नाही, भारतीय संसदेला देखील नाही मग भलेही तुमच्याकडे पाशवी बहुमत का असेना. केशवानंद भारती या ऐतिहासिक खटल्याचा निवाडा आल्यानंतर इंदिराजींनी केलेली २४ वी घटना दुरुस्ती आपोआपच रद्द बातल ठरली. असे असतांना मोदी सरकार घटना बदलणार आहे, असा दुष्प्रचार करुन राहूल गांधी व त्यांचे सर्व सहकारी कोणाची फसवणूक करत आहेत? केशवानंद भारती केसचा निकाल आल्याच्या ३ दिवसांनंतरच इंदिराजींनी सुप्रीम कोर्टातील ३ वरिष्ठ न्यायाधीश न्या.जे एम शेलाट, न्या.ए एन ग्रोवर व

**१९७५ मध्ये इंदिरा गांधींनी आपल्या पंतप्रधानपदाला धोका निर्माण झाल्यामुळे देशावर आणीबाणी लादली आणि संविधानाचा गळा घोटला. त्यावेळी विरोधी लिहणाऱ्या वृत्तपत्रांवर अनेक बंधने घातली गेली. विरोधी विचाराच्या वृत्तपत्रातील मजकूर तपासण्यासाठी पोलीस अधिकारी पाठवले जात असत. आणीबाणी विरोधात निदर्शने करणाऱ्या, मोर्चे काढणाऱ्या विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांना अनेक महिने तुरुंगात डांबले गेले.**

न्या.के एस हेगडे यांची सिनियारिटी डावलून त्यांच्यापेक्षा कनिष्ठ असलेल्या पण आपल्या मर्जीतील न्या ए. एन. रे यांची सुप्रीम कोर्टाच्या सरन्यायाधीशपदी नेमणूक केली होती इतकेच नव्हे तर न्या.रे यांच्या निवृत्तीनंतर न्या.खन्ना यांची ज्येष्ठताक्रम डावलून त्यांच्यापेक्षा कनिष्ठ असलेल्या न्या.बेग यांची सुप्रीम कोर्टाच्या सरन्याधीशपदी नेमणूक केली होती आणि त्याच इंदिराजींचा नातू आज मोदी सरकारवर न्यायालयाचे स्वातंत्र्य मोदींनी हिराऊन घेतले आहे असे निर्लज्जपणे आरोप करतो आहे.

अलाहाबाद हायकोर्टाने इंदिराजींची निवडणूक रद्द करणारा निकाल दिल्यानंतर त्यांनी देशावर आणिबाणी लादली व नंतर आपल्या मर्जीतील सरन्यायाधीशाकडून तो निकाल फिरवून घेतला. राजीव गांधी यांनी तर शहाबानो खटल्याचा निकाल संसदेतल्या पाशवी बहुमताच्या बळावर फिरवला होता. यात न्यायालयाचा सन्मान कुठे दिसतो का हे जरा दुर्बिण लावून शोधा.

स्वतः राहूल गांधी यांनी आपल्याच पक्षाच्या मंत्री मंडळाने लोकशाही पद्धतीने पास केलेला ठराव सार्वजनिकरित्या पत्रकार परिषदेत फाडून फेकतो आणि हाच महा ढोंगी राहूल गांधी आज संविधान व लोकशाही बचावाची घोषणा करतांना दिसत आहे तर पाळीव पत्रकार व पाळीव विचारवंत या बद्दल टाळ्या पिटून राहूल गांधींचे तारीफ करतांना थकत नाहीत.

बाटगा मुसलमान अधिक जोराने बांग देतो या म्हणीचा प्रत्यय आणून देण्याचे काम आज संविधान बचाव व लोकशाही बचावाचा मुखवटा धारण करुन राहूल गांधी व त्यांचे सहकारी याच बाटग्यांची भूमिका वटवतांना आज आपल्याला दिसताहेत. मी इथे विस्तारभयास्तव निवडक उदाहरणच दिली आहेत. ■

# 'फेक नरेटीव्ह' चा चक्रव्यूह

> भारतीय जनता पार्टी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरुद्ध लोकसभा निवडणुकीत संविधान बदल, सीएए कायदा या अनुषंगाने मोठा अपप्रचार करण्यात आला. महाराष्ट्रात याच्या जोडीला देवेंद्र फडणवीस यांच्याबाबतीत मराठा आरक्षणाच्या विषयाच्या अनुषंगाने असाच अपप्रचार केला गेला. या विखारी प्रचाराचा भारतीय जनता पार्टीच्या कामगिरीवर परिणाम झाला.

**भाजपा** विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी याबद्दल व्यक्त केलेली खंत राजकारणात धुमाकूळ घालणाऱ्या फेक नरेटिव्हच्या परिणामांचे यथार्थ दर्शन घडविणारी होती. फडणवीस म्हणाले होते की, शरद पवार, उद्धव ठाकरे यांनी मराठा आरक्षणासाठी एकही निर्णय घेतला नाही त्यांना भरभरून मते आणि भाजपा सरकारने आरक्षणासाठी बरंच काही करूनही भाजपाला एवढा विरोध. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री असताना अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली. या महामंडळाच्या माध्यमातून मराठा समाजातील तरुणांना उद्योग व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करून दिले जाते. त्याचं व्याज महामंडळ म्हणजे राज्य सरकार भरते. या योजनेचे एकूण लाभार्थी: ७० हजार ३७५ एवढे आहेत. या तरुणांना ५ हजार २२० कोटींचं कर्जवाटप झालं आहे. १९९९ ते २०१४ या काळात काँग्रेस-राष्ट्रवादी सरकार राज्यात सलग १५ वर्षे सत्तेत होते. मात्र अशा पद्धतीने मराठा समाजातील तरुणांना कर्ज दिलं गेलं नव्हतं. या सरकारने मराठा समाजाच्या तरुणांना व्यवसाय करण्यासाठी एक दमडाही दिला नाही. सारथी महामंडळ स्थापन करून फडणवीस यांनी मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी शिष्यवृत्ती उपलब्ध करून दिली. परदेशात जाऊ इच्छिणाऱ्या मराठा समाजातील ७५ तरुणांना 'एमएस'साठी ६० लाख तर पीएचडीसाठी १.६० कोटी एवढी शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय देवेंद्र फडणवीस यांनीच घेतला. ९ वी ते ११ वी साठी छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती योजनेत २३ हजार २२४ विद्यार्थ्यांना ३१ कोटी रु. एवढी शिष्यवृत्ती दिली गेली. राज्य लोकसेवा आयोग (एमपीएससी), केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांना 'सारथी'मार्फत शिष्यवृत्ती देणे फडणवीस यांनीच सुरु केले. उद्धव ठाकरे-शरद पवारांच्या सरकारने अडीच वर्षे सत्तेत असताना 'सारथी'चे अनुदान बंद केले. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना 'सारथी' संस्थेची स्वायतत्ता अबाधित ठेवण्यात यावी, ही संस्था बंद पाडण्याचे रचण्यात येत असलेले, षड्यंत्र थांबविण्यात यावे, या संस्थेसाठी निधीची तरतूद व्हावी या मागणीसाठी सारथी संस्थेच्या विद्यार्थीसह, तत्कालीन खासदार छत्रपती संभाजी राजे, माजी खासदार सुबोध मोहिते हे सारथी संस्थेच्या कार्यालयाबाहेर उपोषणास बसले होते. मराठा विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी फडणवीस सरकारने स्थापन केलेल्या सारथी कडे उद्धव ठाकरे, शरद पवार यांनी एवढे दुर्लक्ष करूनही आंदोलकांकडून त्यांना बोल लावला जात नाही. देवेंद्रजी मुख्यमंत्री असताना मराठा आरक्षणाचा विषय राज्यात चांगला तापला होता. मराठा समाजाने राज्यभर काढलेल्या मोर्चांमुळे वातावरण ढवळून निघाले होते. या कठीण परिस्थितीतही देवेंद्रजींनी अत्यंत शांतपणे परिस्थिती हाताळली व अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. ह्या काळात काही मंडळींकडून समाजमाध्यमांतून देवेंद्रजींवर अत्यंत गलिच्छ व शिवराळ भाषेत टीकेची झोड उठवणे चालू होते. मात्र देवेंद्रजी विचलित झाले नाहीत. आरक्षणाचा निर्णय होईपर्यंत त्यांनी मराठा समाजाला वेगवेगळ्या सोयी-सवलती दिल्या. अन्य मागासवर्गीय समाजाच्या (ओबीसी) सवलती मराठा समाजाला देणे, मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे चालू करणे यासारखे निर्णय देवेंद्रजींनी तातडीने घेतले. मराठा विद्यार्थ्यांची निम्मी फी भरणे, १० लाखांपर्यंतचे शैक्षणिक कर्ज माफ

## उबाठा काळात झालेले शिक्षण घोटाळे

■ २०२१ ला पोलीस भरतीचा पेपर फुटला बोगस विद्यार्थी परीक्षेला बसवले गेले.

परिणाम- **पोलीस भरती रद्द... नंतर पोलीस भरतीच झाली नाही.**

■ शिक्षक भरती २०२१- टीईटी परीक्षेचे पेपर फोडण्यात आले. इथे सुद्धा बोगस शिक्षक भरती करण्यात आले.

परिणाम- **७ हजार बोगस शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्या. याच बोगस ७ हजार शिक्षकांना कायमस्वरूपी ब्लॅक लिस्ट करण्यात आले.**

नोकर भरती विभागाचा अध्यक्ष तुकाराम सुपे याला अटक करण्यात आली, तो आजही तुरुंगात आहे.

■ आरोग्य भरती २०२१ चा पेपर फुटला. राज्याचे तत्कालीन आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी आरोग्य भरती परीक्षा घेतली, परीक्षा केंद्रावर परीक्षार्थी आल्यानंतर परीक्षा रद्द करण्यात आली. कारण, आरोग्य भरतीचे पेपर फुटून मार्केटमध्ये आढळले.

परिणाम - **आरोग्य भरती रद्द**

■ म्हाडा नोकर भरती २०२१ चा पेपर फुटला परीक्षा उद्या आहे, सर्व परीक्षार्थी जमले, उद्या सकाळी परीक्षेचा पेपर सुरू होणार त्याआधीच म्हाडा भरतीचे पेपर मार्केट विकण्यासाठी उपलब्ध.

■ खात्याचे तत्कालिन मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी मध्यरात्री दीड वाजता ऑनलाईन येऊन म्हाडा नोकर भरती रद्द केली. विशेष म्हणजे यात अडकणारे सर्व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे कार्यकर्ते होते.

परिणाम- **म्हाडा नोकर भरती रद्द झाली.**

■ एमआयडीसी नोकर भरती २०२१ चा पेपर फुटला. परिक्षे पूर्वीच पेपर फुटला. परीक्षा रद्द करण्यात आली.

परिणाम- **नोकर भरतीच झाली नाही.**

■ ग्रामसेवक व कृषि अधिकारी भरती या सर्व भरतीत मोठा घोटाळा झाला आहे. ग्रामसेवक आणि नोकर भरती परीक्षेचे पेपर फुटला.

परिणाम- **ग्रामसेवक आणि कृषी अधिकारी भरती सुद्धा रद्द करण्यात आली. मास्टर माइन्ड् एकच! नोकर भरती घेणारी सॉफ्टवेअर कंपनीचा मालक आणि नोकर भरती विभागाचा अध्यक्ष तुकाराम सुपे. तुकाराम सुपे आता तुरुंगात आहे.**

करणे यासारखे निर्णय घेणे सोपे नव्हते, याचे कारण या निर्णयांमुळे सरकारी तिजोरीवर मोठा भार पडणार होता. मात्र असे निर्णय घेताना देवेंद्रजी कचरले नाहीत. मराठा आरक्षणाचा निर्णय जाहीर केल्यानंतर वैद्यकीय अभ्याक्रमासाठी आरक्षण लागू होणार नाही, असा निकाल न्यायालयाने दिला होता. यामुळे मराठा क्रांती मोर्चाचे कार्यकर्ते संतप्त झाले. त्यांनी पुन्हा सरकारविरुद्ध आंदोलनाची भाषा सुरू केली. या स्थितीत मराठा विद्यार्थ्यांनी खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घ्यावा, त्यांच्या शैक्षणिक शुल्काचा भार सरकार उचलेल असा प्रस्ताव देवेंद्रजींपुढे मांडला गेला. सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात जेवढे शुल्क भरावे लागते तेवढे शुल्क मराठा विद्यार्थ्यांनी भरावे, उर्वरित शुल्क सरकार भरेल, असा निर्णय मुख्यमंत्री असलेल्या देवेंद्रजींनी घेतला. यासाठी सरकारला २८ कोटींची तरतूद करावी लागणार होती. ही आकडेवारी तयार झाल्यावर त्यासाठीच्या तरतुदीस देवेंद्रजींनी तातडीने मान्यता दिली. मराठा विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय प्रवेशाबाबत राज्य सरकारने वटहुकूम काढला. असे निर्णय घेणे सोपे नसते, कारण यासाठी काहीशे कोटींची तरतूद करावी लागणार होती. न्यायालयाच्या निर्णयाकडे बोट दाखवत सरकार स्वस्थ बसून राहू शकले असते.

मराठा आरक्षण टिकावे यासाठी उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना सरकारकडून बाजू मांडण्यासाठी मुकुल रोहतगी या प्रसिद्ध विधिज्ञांची नियुक्ती करण्यात आली होती. रोहतगी यांनी न्यायालयात ऑन रेकॉर्ड सांगितलं की,आम्हाला राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांकडून माहिती, कागदपत्रे दिली जात नाहीत, व्यवस्थित माहिती न मिळाल्याने आम्ही बाजू भक्कमपणे मांडू शकत नाही. मुकुल रोहतगी यांनी सांगितलं त्याच्या बातम्या झाल्या. देवेंद्रजींनी राज्य सरकारला याबाबत खबरदारी घेण्याचा सल्ला जाहीरपणे दिला. मात्र काँग्रेस-राष्ट्रवादी-शिवसेनेच्या सरकारने रोहतगी यांनी जे काही सांगितलं ते गंभीरपणे घेतलं नाही. वकिलांना आवश्यक ती माहिती, कागदपत्रे न देणारे अधिकारी कोण याचा शोध त्यावेळचे मुख्यमंत्री असलेल्या उद्धव ठाकरे, शरद पवार यांनी घेतला नाही. आज उबाठा आणि शरद पवार नामानिराळे राहिले आहेत, मात्र कारण नसताना फडणवीस यांच्या वाट्याला शिव्याशाप येत आहेत. ■

# 'पीएम किसान क्रेडिट कार्ड' 5 राज्यात वितरीत करणार

**केंद्रीय** अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा सर्वसाधारण अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांकडे विशेष लक्ष देण्यात आले होते. अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना अनेक भेटवस्तू मिळाल्या. त्यापैकी एक चांगली बातमी पीएम किसान क्रेडिट कार्डबाबतही आली आहे, अर्थमंत्र्यांनी सांगितले की, देशातील पाच राज्यांमध्ये जन समर्थ आधारित किसान क्रेडिट कार्ड जारी केले जातील. किसान क्रेडिट कार्ड योजना शेतकऱ्यांना कमी व्याजावर कर्ज देते. या अल्प मुदतीच्या कर्जामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा भागवण्यास मदत होते. कमी व्याजदरामुळे शेतकऱ्यांना कर्जावर कमी व्याज द्यावे लागत आहे. शेतकऱ्यांना कृषी कार्यासाठी आर्थिक सहाय्य देण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड योजना सुरू करण्यात आली. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ४ टक्के व्याजदराने ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज मिळते. शेतकऱ्यांना सावकारांकडून मिळणाऱ्या कर्जापेक्षा हे कर्ज खूपच स्वस्त आहे. किसान क्रेडिट कार्ड योजनेंतर्गत शेतकऱ्यांना सहज कर्ज मिळते.

भारी व्याज टाळण्यासाठी शेतकरी बांधव हे कार्ड वापरतात. किसान क्रेडिट कार्डसाठी पात्रता वय १८ ते ७५ वर्षे आहे. किसान क्रेडिट कार्ड योजनेअंतर्गत, मृत्यू किंवा कायमचे अपंगत्व आल्यास ५०,००० रुपयांपर्यंत आणि इतर जोखमींसाठी २५,००० रुपयांपर्यंत कव्हरेज प्रदान केले जाते. या योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांना बचत खाते, स्मार्ट कार्ड आणि डेबिट कार्डही दिले जातात. हे क्रेडिट ३ वर्षांसाठी वैध राहते आणि पीक कापणीनंतर शेतकरी त्यांच्या कर्जाची परतफेड करू शकतात. सर्वप्रथम शेतकऱ्याला ज्या बँकेतून कार्ड घ्यायचे आहे त्या बँकेच्या वेब साइटवर जावे लागेल. त्यानंतर किसान क्रेडिट कार्डचा पर्याय निवडा आणि pply वर क्लिक करा. एक अर्ज उघडेल जो तुम्हाला पूर्ण करावा लागेल. फॉर्म सबमिट केल्यानंतर बँक तुमच्याशी संपर्क करेल आणि तुमच्या तपशीलांची पडताळणी करेल. पडताळणीनंतर तुम्हाला तुमचे किसान क्रेडिट कार्ड मिळेल. ■

# भारतातील पहिली कृषी-निर्यात सुविधा मुंबईत जवाहरलाल नेहरु बंदर येथे उपलब्ध होणार

**भारताची** कृषी निर्यात आणि आयातविषयक क्षमता यामध्ये अधिक वाढ करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण कार्य हाती घेत केंद्रीय बंदरे, नौवहन तसेच जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी मुंबईत जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाच्या (जेएनपीए) सुमारे २८४.१९ कोटी रुपये खर्चून 'जेएनपीए येथे पीपीपी अर्थात सार्वजनिक-खासगी तत्वावरील भागीदारीतून निर्यात-आयात आणि देशांतर्गत कृषी माल आधारित प्रक्रिया आणि साठवण सुविधेचा विकास' करण्यासाठीच्या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. जवाहरलाल नेहरू बंदरात सुमारे ६७,४२२ चौरस मीटर क्षेत्रावर जेएनपीए सर्वसमावेशक अत्याधुनिक कृषी सुविधा उभारणार आहे. या अग्रणी सुविधेमुळे लॉजिस्टिक्ससंबंधी अकार्यक्षमतेवर उपाययोजना केली जाईल, वेगवेगळ्या ठिकाणी कृषी मालाची हाताळणी होणे कमी करता येईल आणि कृषी उत्पादनांचे टिकण्याची क्षमता वाढवता येईल. यातून कृषीसंबंधित उत्पादनांना अधिक चांगला भाव, रोजगार निर्मिती तसेच कृषी क्षेत्राची एकंदर वाढ हे लाभ मिळणे अपेक्षित आहे. या प्रकल्पामुळे शेतकरी तसेच निर्यातदार यांचे सक्षमीकरण होईल, मागणीला चालना मिळेल आणि ग्रामीण विकासाला अधिक प्रोत्साहन मिळेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालय (एमओपीएसडब्ल्यू) कृषी निर्यात क्षमता वाढवण्यासोबतच शेतकऱ्यांना आणि ग्रामीण समुदायांना मदत देखील करण्यासाठी सशक्त पायाभूत सुविधा उभारणीप्रती कटिबद्ध आहे. जेएनपीटीयथे या सर्वसमावेशक सुविधेच्या उभारणीमुळे लॉजिस्टिक्स प्रक्रिया सुरळीत होईल, नाशवंत शेत मालाची हानी कमी होईल आणि कृषी उत्पादनांना अधिक चांगला भाव मिळवता येईल. भारताच्या कृषी क्षेत्राला चालना देण्याच्या आणि आपल्या शेतकऱ्यांना सक्षम बनवण्याच्या दिशेने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल आहे, केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी सांगितले. या सुविधेमध्ये बिगर-बासमती तांदूळ, मका, मसाल्यांची पिके, कांदे आणि गहू अशा प्रमुख उत्पादनांच्या निर्यातीचे कार्य होईल. ■

# खादी आणि ग्रामोद्योग उलाढालीने प्रथमच 1.5 लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाअंतर्गत खादी आणि ग्रामोद्योग आयोगाने (केव्हीआयसी) २०२३-२४ या आर्थिक वर्षात उत्पादन, विक्री आणि नवीन रोजगार निर्मितीमध्ये नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे.

२०२३-२४ या आर्थिक वर्षाची तात्पुरती आकडेवारी आज नवी दिल्ली येथे जाहीर करताना, केव्हीआयसीचे अध्यक्ष मनोज कुमार म्हणाले की, यापूर्वीच्या सर्व आकड्यांना मागे टाकून, २०१३-१४ आर्थिक वर्षाच्या तुलनेत विक्रीत ३९९.६९ टक्के (अंदाजे ४००%), उत्पादनात ३१४.७९ टक्के (अंदाजे ३१५%) आणि नवीन रोजगार निर्मितीमध्ये ८०.९६ टक्के (अंदाजे ८१%) वाढ झाली आहे. वर्ष २०१३-१४ च्या तुलनेत २०२२-२३ या आर्थिक वर्षात विक्रीत ३३२.१४%,उत्पादनात २६७.५२% आणि नवीन रोजगार निर्मितीमध्ये ६९.७५% वाढ झाली आहे. कुमार म्हणाले, केव्हीआयसीच्या या उल्लेखनीय कामगिरीने २०४७ पर्यंत 'विकसित भारत'चे स्वप्न साकार करण्यासाठी आणि भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ते म्हणाले, स्वतंत्र भारताच्या इतिहासात २०२३-२४ या आर्थिक वर्षात प्रथमच केव्हीआयसी उत्पादनांच्या विक्रीने १.५५ लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये १.३४ लाख कोटी रुपयांची विक्री झाली होती. 'मोदी सरकार'च्या मागील दहा आर्थिक वर्षांत ग्रामीण भागातील कारागिरांनी बनवलेल्या स्वदेशी खादी आणि ग्रामोद्योग उत्पादनांची विक्री २०१३-१४ या आर्थिक वर्षात ३११५४.२० कोटी रुपये होती, ती २०२३-२४ या आर्थिक वर्षात १५५६७३.१२ कोटी रुपयांच्या सर्वोच्च पातळीपर्यंत वाढली आहे,जी आतापर्यंतची सर्वोत्कृष्ट कामगिरी आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात केव्हीआयसीच्या प्रयत्नांमुळे ग्रामीण भागात १०.१७ लाख नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत, परिणामी ग्रामीण भारताची अर्थव्यवस्था मजबूत झाली आहे.

केव्हीआयसीच्या अध्यक्षांनी या ऐतिहासिक कामगिरीचे श्रेय पूज्य बापूंची प्रेरणा, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची हमी




आणि देशातील दुर्गम खेड्यांमध्ये काम करणाऱ्या कोट्यवधी कारागिरांच्या अथक परिश्रमाला दिले आहे. ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खादीला दिलेल्या समर्थनामुळे खादी उत्पादनांवरील लोकांचा विश्वास वाढला आहे. युवकांसाठी खादी हे फॅशनचे 'नवीन स्टेटस सिम्बॉल' बनले आहे. बाजारात खादी आणि ग्रामोद्योग उत्पादनांची मागणी झपाट्याने वाढत असून उत्पादन, विक्री आणि रोजगार निर्मितीच्या आकडेवारीवरून ती प्रतिबिंबित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या दहा वर्षांत खादी आणि ग्रामोद्योगाचे उत्पादन वाढवण्यासाठी मोठे बदल करण्यात आले तसेच मोठे निर्णय घेण्यात आले असून त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. देशातील लोकांचा मेक इन इंडिया, 'वोकल फॉर लोकल' आणि 'स्वदेशी उत्पादनांवर विश्वास वाढल्याचे या आकड्यांवरून सिद्ध होते असे ते म्हणाले. आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये २६,१०९.०८ कोटी रुपये उत्पादन असलेल्या खादी आणि ग्रामोद्योग उत्पादनाने आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ३१४.७९ टक्क्यांनी वाढ नोंदवत १०८,२९७.६८ कोटी रुपये मूल्य गाठले. तर आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये उत्पादन ९५९५६.६७ कोटी रुपये होते. ■

# राज्यातील ७.५ अश्वशक्ती पर्यंतच्या सर्व शेतीपंप ग्राहकांना शासनाकडून मोफत वीज

**राज्यातील** शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना – २०२४ शासनाने लागू केली आहे. त्यामुळे आता ७.५ अश्वशक्ती पर्यंतच्या शेतीपंपाचा वापर करणाऱ्या राज्यातील सर्व शेतकऱ्यांना मोफत वीज मिळणार आहे. जागतिक हवामान बदल आणि अनियमित पर्जन्यामुळे राज्यातील शेतकरी अडचणीत आला आहे. या शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी शासनाने धोरण ठरविले. त्यानुसार आता एप्रिल २०२४ पासून मार्च २०२९ पर्यंत राज्यात मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना – २०२४ राबविण्यात येत आहे. तथापि, या योजनेचा ३ वर्षांत आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यात येणार आहे. या योजनेमुळे, सध्या देण्यात येणारे वीज दर सवलतीचे ६,९८५ कोटी रुपये तसेच वीज दर माफीनुसार ७,७७५ कोटी रुपये खर्च होणार आहे. त्यामुळे एकूण १४,७६० कोटी रुपयांची वीज दर माफी राज्यातील शेतकऱ्यांसाठी केली जात आहे. याबाबतचा शासन निर्णय शासनाने जारी केला असून तो महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आला आहे.

या योजनेअंतर्गत राज्यातील ७.५ एचपी पर्यंतच्या कृषी पंप ग्राहकांना एप्रिलपासूनच मोफत वीज दिली जाणार आहे. या योजनेचा लाभ राज्यातील ४४ लाख तीन हजार शेतकऱ्यांना मिळणार आहे. उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर सादर करताना या योजने बाबत घोषणा केली होती. त्याचा शासन आदेश काल (२५) सरकारने काढला आहे. या योजनेचा कालावधी आहे ५ वर्ष म्हणजेच एप्रिल २०२४ ते मार्च २०२९ पर्यंत असणार आहे. यामध्ये तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर जर या योजनेमध्ये काही बदल करायचा असेल तर, ते बदल करू शकतात. या योजनेचा लाभ घेण्यासाठी मात्र एक अट आहे. आणि ती अट म्हणजेच लाभार्थी हा ७.५ एचपी ग्राहक असावा. ही माहिती दिनांक २५ जुलै २०२४ रोजी निर्गमित झालेली आहे. विद्युत अधिनियमातील कलम ६५ अन्वये कोणत्याही ग्राहकांना अथवा ग्राहक वर्गवारीला अनुदान देऊन त्यानुसार




अनुदानित वीज दर लागू करण्याचे अधिकार राज्य शासनाला प्रदान करण्यात आलं आहे. त्यानुसार वीज माफ केल्यानंतर वीजदर सवलती पोटी रक्कम शासनाकडून महावितरणला अग्रीम स्वरूपात वर्ग करण्यात येणार आहे. त्यामुळे अधिक वीज बिल माफीनुसार ६ हजार ९८५ कोटी रुपये आणि ७ हजार ७७५ कोटी रुपये सवलतीपोटी असे एकूण मिळून असे एकूण १४ हजार ७६० कोटी महावितरणला या निर्णयामुळे शासनाला अदा करावे लागणार आहेत. या योजनेचा मुख्य उद्देश असा आहे की शेतकरी राजाला त्याच्या सगळ्या अडचणीतुन मुक्त करणे आणि त्या शेतकऱ्यांवरील आर्थिक भार कमी करणे आणि त्यांच्या उत्पादकतेत वाढ करणे हा आहे. वीज बिलांच्या चिंतेतून मुक्त झाल्याने, शेतकरी आपले संपूर्ण लक्ष जेणेकरून आपल्या शेतीवर केंद्रित करू शकतील. याशिवाय, ही योजना शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यास प्रोत्साहन देईल. एप्रिल २०२४ पासून ७.५ अश्वशक्ती पर्यंतच्या शेतीपंप ग्राहकांना मोफत वीज मिळणार आहे. शासनास विद्युत अधिनियम २००३, कलम ६५ अन्वये कोणत्याही ग्राहकांना अथवा ग्राहक वर्गवारीला अनुदान देऊन त्यानुसार अनुदानित वीज दर लागू करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यानुसार वीज बिल माफ केल्यानंतर या वीजदर सवलती पोटी रक्कम शासनाकडून महावितरण कंपनीला अग्रीम स्वरुपात वर्ग करण्यात येईल. ■

# बूथपातळीपर्यंत बुद्धिजीवी प्रकोष्टचे कार्य पोहोचवणार



**नाशिक:** आगामी विधानसभा, मनपा आणि इतर विविध निवडणूकाबाबत बैठक नुकतीच संपन्न झाली. आपण बुद्धिजीवी प्रकोष्टच्या माध्यमातून केंद्र, राज्य सरकारच्या विविध योजना व उपक्रम घराघरापर्यंत पोचवणार असे प्रतिपादन बुद्धिजीवी प्रकोष्टचे महानगर संयोजक डॉ. श्रीधर व्यवहारे यांनी केले. यावेळी व्यासपीठावर शहराध्यक्ष प्रशांत जाधव, आ.देवयानी फरांदे, कर्नल एस.के. खाजगीवाले, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, गुड गव्हर्नन्स सेलचे संयोजक व प्रदेश प्रवक्ते प्रदीप पेशकर, प्रदेश प्रवक्ते गोविंद बोरसे, सरचिटणीस काशिनाथ शिलेदार, ॲड. श्याम बडोदे, प्रा.कुणाल वाघ,प्रवीण जोशी उपस्थित होते.

डॉ. व्यवहारे पुढे म्हणाले की लोकसभा निवडणुकीत कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी अतोनात मेहनत केली. परंतु विरोधी पक्षाने जनतेत विविध विषयावर भ्रम निर्माण करून अपप्रचार केला व त्यांचे उमेदवार निवडून आणण्यात त्यांना यश मिळाले. परंतु आता गाफील न राहता विरोधकांनी निर्माण केलेले भ्रमाच वातावरण पुसून टाकण्याची जबाबदारी बुध्दीजिवी प्रकोष्टसह कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची आहे. यावेळी डॉ.सुनीला सायखेडकर, विजय भावे, विकास देशपांडे, विवेक दुग्गल, डॉ. साईखेडकर, कर्नल गोडबोले, सतीश पांढरकर, वसंत उशीर, प्रदिप पाटील, अजित कांकरीया, संजय पाठक, उदय जोशी, डॉ. चंद्रशेखर नामपुरकर, सुवर्णा आघाशे, प्रवीण नाईक, डॉ. हरी गर्गे, अशोक कुलकर्णी, ॲड. विदेश नाशिककर, विजय ठाकूर यांच्यासह शहरातील डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, शिक्षक, इंजिनियर्स, आर्किटेक्ट, शास्त्रज्ञ व अनेक मान्यवर उपस्थित होते. ■

# रत्नागिरी दक्षिण मंडल बैठक

**रत्नागिरी** दक्षिण मंडलमध्ये पावस, हरचेरी, पाली–हातखंबा, नाचणे, कुवारबाव या ठिकाणी महायुती सरकारच्या अर्थसंकल्पातील प्रमुख गोष्टींची माहिती देण्यासाठी बैठका झाल्या. माजी आमदार बाळ माने यांनी या बैठकांना मार्गदर्शन केले. महायुती सरकारच्या कल्याणकारी योजनांचा सर्वसामान्य माणसाला फायदा करून देण्यासाठी पक्ष कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत. समाजातील प्रत्येक घटकाला पक्षांशी जोडून घेण्याचा प्रयत्न करा, असे आवाहन श्री. माने यांनी या बैठकांमध्ये केले. रत्नागिरी दक्षिण तालुकाध्यक्ष संयोग दळी, सरचिटणीस सुशांत पाटकर, राजेश पाथरे, अनघा साळवी, रवींद्र भाट्ये, निरंजन जठार, विजय गावडे, महेश खानविलकर, ओमकार फडके आदी यावेळी उपस्थित होते. ■

# रत्नागिरी दक्षिण ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्षपदी कृष्णकांत जठार

**रत्नागिरी** दक्षिण ओबीसी मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी कृष्णकांत जठार यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली. जिल्हा कार्यसमितीच्या बैठकीमध्ये श्री. जठार यांचा सार्वजनिक बांधकाम रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ नेते व माजी आमदार बाळ माने, दक्षिण रत्नागिरी जिल्हाध्यक्ष राजेश सावंत, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, आ. निरंजन डावखरे आदी यावेळी उपस्थित होते. ■

# इचलकरंजी युवा मोर्चातर्फे निवेदन

मुलींना उच्च शिक्षण मोफत देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी दत्ताजीराव कदम महाविद्यालय, डी.के.टी.ई. महाविद्यालय, शरद इन्स्टिट्यूट या महाविद्यालया मध्ये युवा मोर्चाच्यावतीने शहराध्यक्ष पै.अमृतमामा भोसले, जयेश बुगड यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले. अश्विनी कुबडगे, मयूर दाभोळकर, मनोज तराळ, हेमंत वरुटे, सचिन पवार, चिदानंद कोटगी, दिपक रावळ, रोहित मुधाळे, हर्षवर्धन गोरे, कुमार शिंदे, शुभम भाकडे, मनोज जाधव आदी उपस्थित होते. ■






**कोल्हापूर– सांगली, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांची विभागीय बैठक– उपस्थिती–** उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे, खा. धनंजय महाडिक, माजी खासदार संजयकाका पाटील, समरजीत सिंह घाटगे, आ.सुधीर गाडगीळ, आ. गोपीचंद पडळकर, माजी आमदार अमल महाडिक, नितीनराजे शिंदे, दीपकबाबा शिंदे, महेश जाधव आदी.




**नाशिक– विभागीय बैठक– उपस्थिती–** महसूल मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, शहराध्यक्ष प्रशांत जाधव, डॉ.भारती पवार, आ.प्रा.देवयानी फरांदे, आ.सीमा हिरे, आ.दिलीप बोरसे, आ.राहुल ढिकले, आ.राहुल आहेर, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, बाळासाहेब सानप, सुनील बच्छाव, शंकर वाघ, नीलेश कचवे, गिरीश पालवे, विजय साने, रंजना भानसी, काशिनाथ शिलेदार आदी.



**कराड (जि.सातारा)– बूथ प्रमुख मार्गदर्शन बैठक– उपस्थिती–** ज्येष्ठ नेते अतुल भोसले, प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, धनाजी पाटील आदी.



**शहापूर– ६५० विद्यार्थ्यांचा सन्मान– उपस्थिती–** माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, शहापूर विधानसभा प्रमुख अशोक इरनक, तालुकाध्यक्ष भास्कर जाधव, शहराध्यक्ष विवेक नार्वेकर, नंदकुमार मोगरे, लेखक युवराज गायकवाड आदी.



**नांदेड– बूथ रचना कार्य योजना– उपस्थिती–** मराठवाडा संयोजक प्रवीण साले, जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, जिल्हा संयोजक बाबुराव केंद्रे, विधानसभा संयोजक चंद्रशेखर कदम, तात्याराव वाकोडे, गजानन चहेल, भागवत देवसरकर, गजानन तुम्मेवार, व्यंकटेश लोणे, उत्तम कदम, लता फाळके, आशिष सकवान, सुधाकर कदम, प्रकाश राठोड, सुधाकर पाटील आदी.



**मालेगाव– मतदार नोंदणी अभियान– उपस्थिती–** विधानसभा प्रमुख व शहराध्यक्ष देवा पाटील, दादा जाधव, हरिप्रसाद गुप्ता, नंदू सोयगावकर, सुरेखा भुसे, शरद पानपाटील, संजय कन्नल, मनिषा खैरनार, डि.डि.पगारे, नाना अहिरे, सुरेश निकम, शिवसेना नेते प्रमोद पाटील, दिलीप गोरे, जिभाऊ देवरे, सोनाली दसपुते, अल्का पगारे, शिल्पा सूर्यवंशी, भागाला वाघ, संगीता पवार, समाधान सूर्यवंशी, रमेश अहिरे, मोहन अहिरे आदी.

# संघटना चित्र वृत्त





**रायगड– जिल्हा पदाधिकारी संवाद– उपस्थिती–** सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, आ. रवीशेठ पाटील, रायगड लोकसभा प्रमुख सतीश धारप, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, जिल्हा सरचिटणीस महेश मोहिते, मिलिंद पाटील, प्रशांत शिंदे, बिपिन महामुनकर, गीताताई पालरेचा, उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, मनीषा कुद्रीमोती, हेमा मानकर, निलेश थोरे आदी.



**चिपळूण– रत्नागिरी उत्तर जिल्हा कार्यकारिणी बैठक– उपस्थिती–** सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, आ. निरंजन डावखरे, विभाग संघटन मंत्री शैलेंद्र दळवी, माजी आमदार डॉ.विनय नातू, सर्यूकांत दळवी, प्रशांत शिरगावकर आदी.




**सांगोला (जि.सोलापुर)– बूथ रचना कार्य योजना– उपस्थिती–** जिल्हाध्यक्ष आ.सचिन कल्याणशेट्टी, शिवाजीराव गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष संभाजी आलदर, उत्तर मंडल अध्यक्ष अतुल पवार, दक्षिण मंडल अध्यक्ष दुर्योधन हिप्परकर, बूथ रचना संयोजक लक्ष्मण केंकान, प्रदेश कार्यकारणी सदस्य गजानन भाकरे, लोकसभा विस्तारक अनंत राऊत, सरचिटणीस शिवाजी ठोकळे आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp













प्रति,

**प्रेषक,**

**कार्यालय मंत्री :**

भारतीय जनता पार्टी,

महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,

वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०

दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५

ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com